म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

१९

चरित्र

Baroda Rem 279
Presented to the ... by Major V. Bahadoor

26.6

[ काव्येतिहास-संग्रह ]

धावडशी येथील

# ब्रह्मेंद्रस्वामी ऊर्फ भार्गवबावा यांचें चरित्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय

हें

अनेक प्रतींवरून शुद्ध करून अर्थनिर्णायक व अवांतर

माहितीच्या विपुल टीपांसह

काव्येतिहास-संग्रहकर्ते

यांणीं

प्रकाशित केलें.

संपादक: काशीनाथ नारा...

एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थान्परित्यज्य ये ।

भर्तृहरिः

इ० स० १८८२.

श्री

महाराष्ट्राच्या भाषेचा व इतिहासाचा आस्थापूर्वक

अभ्यास करूं इच्छिणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

परम प्रेमपूर्वक अर्पण करितों.

ग्रंथ-प्रकाशक.

श्रीभार्गवराम.

# धावडशी येथील ब्रह्मेंद्र स्वामींचें चरित्र*.

॥ श्रीगणेशायनम: ॥ आदि पवित्र संस्थान धावडशी प्रांत वांई. श्रीपरमहंस ब्रह्मेंद्र स्वामी हे पूर्वी ग्रहस्थाश्रमी वऱ्हाड प्रांतें श्रीगणपतीचे राजुरानजीक दुधेवाडी सोमठाणा येथें सुखवस्तीस होते. अनुत्पन्न[१] ब्राह्मणाचे पुत्र सात आठ वर्षांचे झाल्यानंतर माता पिता यांणीं भिक्षाटण करून व्रतबंध केला. तदनंतर तीन चार वर्षांपर्यंत विद्या शास्त्राभ्यास केला. अल्पवय, परंतु बुद्धि विशाळ. योगनिष्ठ संसार विषयांत विरक्त जपतप अनुष्ठाना विषयीं परम आसक्त. बारा वर्षांचे झाले तों माता पिता वृद्ध होतीं. दरिद्रें करून परम जर्जर. कालवशें करून त्या उभयतांचाही काल झाला. त्यांचें सार्थक करून, सचिंत होऊन, चित्तामध्यें कल्पना आणिली जे, संसार सुख क्षणिक, कांहीं देवताराधन करावें. ही कल्पना करून राजुरी येथील गणपती महासिद्ध स्थान पाहून, तेथें येऊन, श्रीची आराधन सेवा मांडिली. अन्न वर्ज केलें. निराहारी-अनुष्ठान चालविलें. नित्य गोमूत्र प्राशन करावें. फळफळावळ मिळाल्यास भक्षावें. संकटचतुर्थीचे दिवशीं सूर्योदयीं स्नानसंध्या उरकून एके पायावर देवासंनिध चंद्रोदय होई तों पर्यंत उभें राहून जप करावा. तदनंतर देवाची पूजा करावी. प्रदक्षणा कराव्या. देवास नमस्कार घालावे. श्रावण शुद्ध १ पासून

---

* ही बखर रा. रा. परशुराम भिकाजी भाटे वकाल डि॰ कोर्ट रत्नागिरी यांणीं सातान्याहून आह्मांकडे पाठविली. धावडशी संस्थानाच्या दप्तरांत हिची अस्सल प्रत असावी, परंतु त्या संस्थानच्या मालकांपासून ती मिळेल अशी आशा तूर्त तरी नाहीं. मिळालेली प्रत धावडशीहूनच परशुरामपंत यांस प्राप्त झाली. ही कोणी व केव्हां लिहिली ह्याचा शोध लागला नाहीं.

सुमारें सन इ.१७००पासून पुढें शाहूमहाराजांचे कारकिर्दीच्या अखेरीचे सुमारा पर्यंत ह्या महापुरुषाचें वास्तव्य महाराष्ट्र देशांत होतें. ह्या काळांत आह्मां मराठ्यांमध्यें जितके मोठमोठे राजधुरंधर पुरुष उत्कर्ष पावले त्यांतून प्राय: सर्वांवर स्वामींची कृपा असून त्यांचा स्वामींशीं पत्रव्यवहारही असे. श्री॰ बाजीराव बल्लाळ व त्यांचे कुटुंबांतील पुरुषांचें तर स्वामींशीं विशेष दळण वळण असे. बाजीरावाचे महापुरुष धावडशीचे स्वामी होते ह्मणून इतिहासांत ज्यांची प्रसिद्धि आहे ते हेच स्वामी होत. ह्यांणीं कोणत्या पुरुषांवर अनुग्रह केला व कोणतीं अलौकिक कृत्यें केलीं वगैरे हकीकत पुढें समजणार आहेच. यांस पाठविलेलीं कांहीं पत्रेंही आह्मांकडे आलीं आहेत तीं लौकरच छापून प्रसिद्ध होतील. ह्या साधु चरित्रा पासून तव्हांची देशस्थिति, लोकांच्या समजुती. व राज्य कर्त्या पुरुषांची माहिती वगैरे गोष्टींचें बरेंच ज्ञान होईल.

१. अनुत्पन्न=उपजीविकेच्या साधनां विरहित, गरीब.

भाद्रपद शुद्ध ४ पर्यंत एकासनीं एकांतीं समाधिस्थ बसून जप करावा. या प्रमाणें बारा वर्षे पर्यंत राजुरीं श्रीसंनिध बहुत सेवा झाली. तेव्हां श्री सुप्रसन्न होऊन, प्रत्यक्ष दर्शन देऊन, आज्ञा केली जे, "तुझी कार्यसिद्धी झाली. सर्व मान्य होसील. जे कल्पना चित्तीं धरिसील ते मत् प्रसादें सिद्ध होईल. अतःपर सेवेचा बहुत निकर्ष[२] न करणें; ब्रह्मवृत्ति राहून सदैव माझें आराधनच करीत जाणें." या प्रमाणें देवाची आज्ञा झाली.

यानंतर अनुष्ठान समाप्त करून, साहित्य मिळवून, ब्राह्मणभोजन समाराधना करून, श्रीची आज्ञा घेऊन, निघोन श्री काशीक्षेत्रास आले. तिरस्थळी[३] यात्रा करून कांहीं दिवस काशीवास केला. पूर्ववत् प्रमाणें श्रीगणपतीचें आराधन, नित्य पार्थिव गणपती व महादेव करून, हस्तावर पूजन करून उदकांत विसर्जन करावें. हा नित्य नेम. संकटचतुर्थी एके पायावर पूर्ववत् प्रमाणें करावी. अन्न भक्षण नाहीं. गोमूत्र प्राशन करावें. निराहाराचा उपहार मिळाल्यास करावा. या प्रमाणें नित्य व्रत चालिलेंच असे.

पुढें चतुर्थाश्रम संपादावा ही कल्पना झाली. त्याप्रमाणें श्रीकाशीक्षेत्रीं चतुर्थाश्रम संपादून, परमहंसदीक्षा घेऊन, ब्रह्मेंद्रस्वामी हें नामाभिधान गुरु ज्ञानेंद्रस्वामी पासून प्राप्त झालियानंतर कांहीं दिवस गुरुसंनिध राहून उत्तरमानस-यात्रा करावी याअर्थी गुरुस्वामीची आज्ञा घेऊन निघाले. ते उत्तरमानस-तीर्थ-यात्रा करीत बद्रीनारायण पर्यंत करून, माघारे फिरून, वाराणशीस आले. तेथून दक्षणमानस[४] तीर्थ यात्रा करावी हा उद्योग करून, श्रीवोढेजगन्नाथाकडोन श्रीरामेश्वरास गेले. तेथील तीर्थयात्रा करीत श्रीकृष्णातीरानें सातार प्रांतीं आले. तों झाडून अंमल मोंगलाई[५]. थोडे बहुत पहाडी किल्ले [तेथें] मात्र राजाचा अंमल मातोश्री ताराबाई शिवाजी माहाराज यांची सून, राजाराम यांची स्त्री, किल्ले रांगणा येथें होती. सातारा वगैरे किल्ले आई साहेबांकडे. वरकड कऱ्हाड, वांई आदिकरून सारीं ठाणीं प्रांतांत मोंगलांचीं. या कारितां श्री स्वामींचें चित्त सातारा प्रांतीं न रमे. तेव्हां निघून सह्याद्री उतरून कोंकणांत चिपळून प्रांतें गेले. तिकडेही हपशी याचा अंमल. श्रीपरशुराम मौजे पेढें येथें येऊन, देव दर्शन केलें. देवाचे

---

२. निकर्ष = हटयोग, दुराग्रह.

३ तिरस्थळी = त्रिस्थळी—प्रयाग, काशी, गया हीं तीन.

४. दक्षिणमानस = रामेश्वर.

५ मोंगलाई—संभाजी राजे यांस स॰इ॰ १६८९ साली मारिलें. राजाराम याचा काळ १७०० मध्यें झाला. त्यानंतर शाहू महाराजांचा अंमल बसे पर्यंत देशांत स्वस्थता नव्हती. बहुतेक स्वदेश मुसलमानांच्या व पाळेगारांच्या हातीं होता. ताराबाई साहेब राजारामाचे पश्चात् राहिलेल्या मराठी राज्याचा कारभार पहात असत.

आसपास महा अरण्य निवांत स्थळ पाहून देवाचे पश्चमेकडे धामणी सोलगांव याचे रानांत डोंगरांत एक गुहा दगडाची होती, तेथें पाणी उदक चांगलें, मनुष्याची वाग नाहीं, असें स्थळ पाहून त्या अरण्यांत तपश्चर्या करीत राहिले.

मौजे पेढें येथें बाळगौळी होता तो त्या रानामध्यें गुरें चारावया निमित्य गेला, तों दैववशांत स्वामीं [चे] स्थळापाशीं आला. तों स्वामींचें दर्शन भाषण जाहलें. गौळी यास आज्ञा केली जे, दर्शन जाहलें हें कोणाजवळ न सांगावें. तपस्वी पाहून गौळी मजकूर याची निष्ठा बसली. नित्य दर्शनास कोणा न कळत जावें. कंदमुळें आणून द्यावीं. गोमूत्र प्राशनास आणून द्यावें. असे बहुत दाहा बारा वर्षें गुप्तरूपें अरंण्यांत होते.

एके दिवशीं बाळगौळी हिरवे आंबे घेऊन गेला. स्वामींचें अनुष्ठान झाल्यावर गुहेंतून बाहेर आले तों गौळी याणें आंबे नेऊन पुढें ठेविले. आंबे हिरवे पाहून स्वामींनीं गौळी यास आज्ञा केली जे, खळगा खणून आंत गवत घालून ४ आंबे पिकत घालणें. त्याप्रमाणें गौळी याणें खळी खणून गवत घालून आंबे पिकत घालून वर माती टाकिली. त्याजवर दोचौं दिवसांनीं गौळी स्वामींचे दर्शनास आला. स्वामींचा जप जाहलियावर बाहेर आले. गौळी याणें कांहीं कंदमुळें अर्पण करून संनिध बसला. तों स्वामींस आंब्यांचें स्मरण होऊन जेथें आंबे पिकत घातले [होते] तेथें येऊन आपले हातें गवतावरील माती काढून, गवत काढावयासि लागले. तों त्या आंब्यांचे खळीमध्यें गवतांत मोठा सर्प भुजंग जाऊन बसला होता, त्यास हात लागतांच उठोन हातास दंश केला. रुधिराची धार हातास लागली. हें वृत्त गौळी यानें आपले दृष्टीनें पाहून भयाभीत होऊन आपले घरास निघोन गेला. सर्पदंश जाहला, आतां गोसांवी वांचत नाहीं. हा निश्चय गौळी यास समजला होता. दुसरे दिवशीं गौळी याणें विचार केला जे गोसांवी याची काय गत झाली [तें] जाऊन पाहावें. ह्मणोन गुहेजवळ आला. तों स्वामी जप करीत बसले आहेत. विषाची बाधा किमपी जाहली नाहीं. हें पाहून गौळी यास महदाश्चर्य होऊन, महापुरुष थोर ही आस्था[६] बसली. त्या दिवशीं घरीं येऊन हें चमत्काराचें वर्तमान सांगितलें.

चिपळुणामध्यें हबसी याजकडून भाबाजी बल्लाळ यांस सुभा होता व बाळाजी विश्वनाथ यांस मिठबंदरचा हवाला[७] होता. त्यांस गौळी याणें हें वर्त-

---

६ आस्था = निष्ठा, भाव.

७. हवाला = नायकी, मुख्य अधिकार. ही बाळाजीची स्थिती ध्यानांत ठेवण्या जोगी आहे.

मान सांगितलें. तेव्हां उभयतां श्री स्वामींचे दर्शनास आले. दर्शन भाषणें जाहलीं. यानंतर बाळाजीपंतीं व आबाजी बल्लाळ यांणीं विनंती केली जे, आमचा हेत स्वामींचे चरण आमचे आश्रमास लागावे. हा आमचा बहुत मानस आहे. पुढील कर्तव्यार्थ चित्तांत आणून, स्वामींनीं विनंती मान्य करून, एके दिवशीं त्यांचे घरास चिपळुणास समागमें बाळागौळी घेऊन आले. स्वामींचे आगमन जाहलें येणें करून फार संतोषी होऊन, स्वामींचा बहुत सत्कार करून, पूजा करून विनंती केली जे, "पर्जन्यकाल आहे, आठ चार दिवस स्वामींनीं वास्तव्य येथें करावें." स्वामींनीं मान्य केलें. परंतु नित्य नेम श्रीभार्गवराम याचें दर्शन घ्यावें. मध्यें नदी. खाडीस पाणी फार. पायउतार नाहीं. तेव्हां चिपळुणाहून रात्रौ सर्वांनीं निद्रा केलियावर केळीचें पान खाडीमध्यें पाण्यांत टाकून त्याजवरून खाडी तरून, परशुरामीं येऊन, देवदर्शन करून जावें. याप्रमाणें दोन तीन दिवस जाहलियावर बाळाजी विश्वनाथ व आबाजी बल्लाळ यांस वर्तमान कळलें जे, स्वामी रात्रौ एकटे खाडी उतरून, देवास जाऊन माघारे येतात. तेव्हां त्यांणीं चोर पाळत लावून जातीनिशीं रात्रीं जाऊन, आपले दृष्टीनें पाहिलें. केळीचे पानावरून पलीकडे जाऊन, देवदर्शन करून आले. हा चमत्कार पाहून बाळाजीपंत नानांची निष्ठा स्वामींचे जागां फारच बसली व स्वामींची ही कृपा दिवसें दिवस होत चालली. आठ दिवस चिपळुणांत राहून उभयतांस आज्ञा केली जे, "आह्मी श्रीसंनिध जातों. देवालयाचें वगैरे काम इमारत श्रीस्थळीं करावी हे इच्छा आहे. तुह्मीं सर्व प्रकारें साहित्य करावें."

या प्रमाणें उभयतांस सांगोन स्वामी शके १६२७ सर्वजित्[८]नामसंवत्सरीं पौष शुद्ध १९ मेस सन समान तिसेनांत श्रीपरशुरामीं देवाजवळ प्रगटरूपें राहिले. श्रीगणपतीची उपासना नित्य पार्थिव गणपती महादेव करून, हातावर पूजा करून, उदकांत विसर्जन करावें. संकटचतुर्थीस एक पायावर चंद्रोदय पर्यंत उभें राहून जप करावा. श्रावणमासीं एकवीस दिवस पर्यंत एकासनीं गुंफेमध्यें अरण्यांत बसून कवाड चिणून घ्यावें. भाद्रपदमासीं गणेशचतुर्थीस बाहेर निघोन श्रीगणपतीचा उच्छाह करावा. या प्रमाणें पूर्वी पासून नियम चालविला. यांत अंतर किमपी नाहीं. दिवसें दिवस अधिकोत्तर कैलासवासी बाळाजीपंत नानाची निष्ठा स्वामींचे जागीं फार. जे स्वामी आज्ञा करितील त्यांत अंतर पडूं दिलें नाहीं. त्यामुळें स्वामींची पूर्ण कृपा होऊन आशीर्वाद दिला जे, श्रीगजानन व भार्गव तुझे एकाचे एकवीस करून महत्पद देईल.

---

८ 'सर्वजित्' याचे बद्दल 'पार्थिव' । असें असावें.

या प्रमाणें आशीर्वाद स्वामींनीं दिल्या नंतर बाळाजीपंत नाना याणीं मीठ बंदरचा हवाला सोडून चंद्रसेनें जाधवराऊ यांजकडे चाकरीस राहिले. जाधवराव यांणीं कर्ते मनुष्य पाहून पागा सरदारी सांगितली.

[इकडे] स्वामी श्रीस्थळीं राहून कर्णा व निशाण लाल गजाननाचें घेऊन, प्रांतामध्यें भिक्षेचा उद्योग आरंभिला. भिक्षाद्रव्य संपादून परशुरामदेवांजवळ इमारत चालवावी ही कल्पना मनांत आणून निघाले. तो शके १६२९ सर्वजित् संवत्सरीं पौष शुद्ध पौर्णिमेस महाराज शाहूराजे दिल्लीहून पादशहाची आज्ञा घेऊन, सातारा हस्तगत करावा हा उद्देश [धरून] चंदन वंदन किल्यानजीक येऊन, मुक्काम करून राहिले. हें वर्तमान कोंकणांत स्वामींस कळतांच आपले कटिसूत्र कौपीन महाराजांस प्रसाद पाठविला. तदनंतर सातारा हस्तगत करून, मोंगलाई ठाणीं सर्व उठवून, राज्याचा बंदोवस्त करीत चालले. चंद्रसेन जाधवराऊ याचा पराभव केला ते समयीं बाळाजी[१०] विश्वनाथ शाहूमहाराज यांजकडे आले राज्याचा अंमल दिवसेंदिवस अधिकोत्तर होत चालला. श्रीस्वामींनीं बाळगोळी पूर्वी अरण्यांत सेवा केली त्यास आणून गाईम्हसीचें खिल्लार याचे स्वाधीन केलें. इमारतीचें काम[११] स्वामींनीं सुरू केलें. तेव्हां स्वामींजवळ कारकून कोणी नाहीं इमारतीचें काम ध्यावयासि भिक्षेचें द्रव्य ठेवावयास उधा नामें करून गुजर एक स्वामींनीं ठेविला. विशाळगडीं मोंगलाई अंमल त्या प्रांतें स्वामी भिक्षेस गेले. किल्याचे घेरांत गेले तों किल्याचे स्वारीचे लोकांची गांठ पडली त्यांणीं विचारलें, हे कोण ? स्वामींचे समागमें चाकर लोक होते त्यांणीं सांगितलें, परशुरामा कडील गोसांवी. यवनाकडील स्वारीचे लोक समजले कीं, परशराम[१२] त्र्यंबक प्रतिनिधी यांचे गुरु. परशरामपंत मोंग-

---

९. हबशी यांशीं वांकडें आल्यावर बाळाजीपंत वरघाटीं गेला व थोड्याच काळानें त्याणें धनाजी जाधव यांचे पदरीं नौकरी पतकरली. चंद्रसेन हा धनाजीचा पुत्र. ह्याचें व बाळाजीचें मोठें वैमनस्य होतें.

१०. धनाजीची बाळाजीवर मोठी कृपा असे व त्याणेंच धनाजीचें मन वळवून त्यास शाहूचे पक्षास मिळविलें. धनाजीचे पश्चात् चंद्रसेनाशीं बाळाजीचें भांडण होऊन तो मोठ्या प्राणसंकटांत पडला असतां शाहूनें मध्यें पडून त्याचा बचाव केला. तेव्हां पासून जाधव हे मराठ्यांकडून निघून मोंगलांकडे गेले ते गेलेच.

११. परशुराम येथील देवालया विषयीं माहिती आमचे चिपळूण येथील मित्र आह्मां करितां मिळवितील व ह्या चरित्रांत आलेल्या कोंकणांतील गांवांच्या नांवाचें खरें रूप कोणतें तेंही कळवितील अशी त्यांस विनंती आहे.

१२. परशुराम त्रिंबक हा किन्हईचा कुळकर्णी. ह्यानें रामचंद्रपंत अमात्य ह्यांचे हाता खालीं कारकून असतां, मोठमोठीं कामें बजाविलीं. पुढें राजाराम मरण पावल्यावर ताराबाईनें त्यास 'प्रतिनिधी' हें पद देऊन सर्व किल्यांची देखरेख त्याजकडे सोंपविली. मरण काळ सुमारें १७२०.

लांशीं विघडोन राहून किल्ले बळकाऊन होते. त्यामुळें स्वारीचे लोकांनीं स्वामींस अटकाव करून किल्लेदारास सांगून पाठविलें. रात्रौ देवानें किल्लेदारास दृष्टांत चमत्कार कांहीं दाखविला. प्रातःकाळीं किल्लेदार स्वामींचे भेटीस येऊन सर्व वृत्त मनास आणून परशरामपंत [यांचा] संबंध कांहीं नाहीं, परशुराम देव येथील राहणार, महा तपस्वी जाणोन, बहुत सन्मान [करून] स्वारीचे लोकांस बहुत फजीत करून, समागमेंचे माणसांचीं चिरगुटें पांघरुणें, कर्णा, निशाण, थाळा तांब्या, घेतलें होतें तें फिरून देऊन, एक शालजोडी स्वामींस अर्पण करून, आपले तालुक्यांतील भिक्षेचे दस्त करून देऊन, आज्ञा घेऊन किल्यास गेला. स्वामींनीं त्या प्रांतींची भिक्षा घेऊन फिरोन परशुरामीं देवाजवळ आले. इमारतीचे कामाची चौकशी पाहिली. उधा गुजर याचे वस्तु बंदोवस्त यथास्थित होईना.

पूर्वीं चिपळूणची खाडी पर्जन्यकाळीं तरींशिवाय केळीचे पानावर तरोन परशुरामास देवदर्शनास जात येत हें वर्तमान परस्पर दंडाराजपुरीस याकुदखान हपशी तेथील अधिकारी यास श्रुत झालेंच होतें. त्याचेही चित्तांत असे करामती पुरुषाचें दर्शन घ्यावें. करामता पहावी. या अर्थीं राजपुरीहून शामला[13] कडील कारकून स्वामींकडे परशुरामीं येऊन विनंती केली जे, खान साहेबांची इच्छा आहे जे, आपलें दर्शन व्हावें, ह्मणोन [आलों]. श्रीस्वामी यांच्याही मनामध्यें होतें जे इमारतीचा वगैरे बंदोबस्त गुजराचे वर्त्तु[14] होत नाहीं त्यास राजपुरीस खानाचे भेटीस जाऊन एक कारकून मागावा. पेढें आंवडस येथील सनदा इनामतीच्या करून घ्याव्या, असें मनांत होतें. तो योग अनायासें घडोन आला. राजपुरीहून अधिकारी यांजकडून कारकून न्यावयासि आला तेव्हां स्वारीची तयारी करून, कर्णा निशाण समागमें घेऊन राजपुरीनजीक गेले. समागमें हवसी याजकडील कारकून होता तो पुढें तरीवर बसून जंजिरे यांत जाऊन वर्तमान सांगितलें. तेव्हां याकुदखान याणें कारकुनास ताकीद केली जे, "गोसांवी यांचे समागमें ब्राह्मण व माणसें असतील तीं मात्र तरीवरून आलीकडे उतरावीं. गोसांवी यास तरीवर न उतरावें. केळीचे पानावर उतरतात हा चमत्कार पाहणें आहे." आज्ञेप्रमाणें कारकुनानें स्वामींचे समागमें ब्राह्मण व शूद्र मंडळी होती ते तरींत बसवून जंजीरे यास घेऊन एक स्वामी मात्र समुद्रतीरीं राहिले. त्यांस केळीचें पान पाठवून दिलें. आणि खानसाहेब जंजिऱ्याचे बुरुजावर बसोन गोसांवी कोणे रीतीनें कसे उतरतात हें पाहों लागला. हें वर्तमान स्वामींनीं ध्यानांत आणू-

१३. शामल = यवन, म्लेच्छ. | १४. वस्तु = वर्तीनें, हातें.

न, केळीचें पान समुद्रांत टाकून, त्याजवर आसन घालून बसले आणि जं-जीरे तटाकडे समोर जसें जाहाज चालतें त्या रीतीनें केळीचें पान चालविलें आणि किल्याचे बुरजानजीक खालीं आले. हें बुरुजावरून याकुदखान याणें पाहून, चित्तामध्यें मोठा विस्मय मानून, परम भयाभीत होऊन, बुरुजाखालीं उ-तरून, रुमालानें हात गुंडाळून, दरवाजे बाहेर स्वामी संनिध्र येऊन "गुन्हा माफ, गुन्हा, माफ" असें त्रिवार बोलून, पादशाही कुर्निशातें[१५] करून पुढें उभा राहिला. स्वामी [नीं] परम भयाभीत पाहून अभयवचन दिलें "चि-त्तांत कांहीं भय न धरणें, समुद्र तरणें आमची सहजवृत्ति असे. यांत कांहीं अगाध नाहीं." असें स्वामींचें वचन ऐकोन, परम समाधान पावोन, कुर-नीस करून, फार संभ्रम[१६] करून स्वामींस किल्यांत सदरेस नेऊन बसविलें. तोफांची सरबत्ती केली. वस्त्रें अर्पण केलीं. स्वामींनीं त्यास प्रसाद दिला. वस्त्रें दिलीं. पेढें आंबडस या दोन्ही गांवच्या इनामतीच्या सनदा करून दिल्या. निरोप घेते समयीं स्वामी खानास बोलिले जे, "आह्मी श्रीस्थळीं[१७] कारखाना इमारत चालविली आहे. लिहिण्याचा वगैरे बंदोबस्त होत नाहीं. एक कारकून आपणाकडील आम्हांस द्यावा." तेव्हां याकुदखान बोलिले, "दप्तरामध्यें चारशें कारकून लिहीत आहेत, त्यांमध्यें आपले खातरेस जो कारकून येईल तो घेऊन जावा." असें सांगितलें. नंतर स्वामी दप्तरांत जाऊन, सर्व कारकून मंडळी अवलोकन करोन, त्यांत बापूजीपंत याचें चलन वलन भजन फारच पाहिलें. त्याजवर बापूजीपंतास पुसिलें कीं, मजकडे चाकर राहणें. त्याजवरून मशार निल्हेनीं स्वामींची आज्ञा मान्य करून आणि विनंती केली जे, "राजपु-रीची इमारत किल्याची लाविली त्याचे खर्चाची पट्टी वतनदार, खोत, कुळ-कर्णी, जमीदार यांजवर जीव न पाहून घातली. हवेली तर्फेचे, कुळकर्ण मजकडे आहे. त्यामुळें शंभर रुपये खंड तर्फेवर आला आहे त्या गुंत्या मुळें हिशोबास येथें हुजूर आहें." असें वर्तमान पंत मशारनिल्हे यांणीं स्वामींस नि-वेदन केलें. तदनंतर स्वामींनीं खान यांस आज्ञा केली जे, "हवेली तर्फेचे खंडाबाबत शंभर रुपयांचा गुंता बापूजीपंताकडे आहे ते रुपये आह्मांस भि-क्षा देऊन बापूजीपंत कारकून आम्हांस देणें."स्वामींचे आज्ञेप्रमाणें खान यांणीं शंभर रुपये भिक्षार्पण स्वामींस केली म्हणोन बापोजीपंतास निरोप दिला. स्वामी खानाचा निरोप घेऊन बापूजीपंत समागमें घेऊन परशुरामास आले.

---

१५. कुर्निशात्=कोर्निषात्=जमीनी-स हात लावून नम्रपणें सलाम करतात तो. बादशाही=बादशहास योग्य असा.

१६. संभ्रम=आदरातिथ्याची गडबड.

१७. श्रीस्थळीं=परशुरामास.

[पुढें] लिहिण्याचें वगैरे कामकाज बापूजीपंतास सांगितलें. तेव्हां उधा गुजर याजकडील कारभार कमती पडला. त्यामुळें गुजर मजकुरानें बापूजीपंताशीं आकस मांडिला. श्रीस्वामी पंत मशारनिल्हेस हिशोबाचा जाबसाल पुशीत तेव्हां गुजरानें धर्मशाळेंत कोठीमध्यें हिशोबाचे रुमाल असत त्यांतील कागदपत्र काढून तसनस गळांठा[१८] करावा. यामुळें समयीं जावसाल समर्पक न होईत. तेव्हां स्वामी पंत मशारनिल्हेवर रागें भरत. गुजर नामानिराळा. असे आठ पंधरा दिवस होत आले तेव्हां इमारतीचे कारखान्यावरील माणसें [यांणीं] हिशेव कितेव यथास्थित होत यामुळें बापूजीपंतास सांगितलें जे, उधा गुजर तुमचा रुमाल सोडून, कागद काढून घुसीचे तोंडीं फाडून टाकितो. तुम्हांस पारपत्य होईल तरि चोर धरितों." असें सांगून मुद्यावर धरिला. तेव्हां श्री स्वामींजवळ जाऊन बापूजीपंतीं विनंती केली, "मजला निरोप द्यावा. नित्य स्वामी मजवर रागें भरतात. रुमाल सोडून कागदांची तसनस गुजर करितो माझा उपाय नाहीं." त्याजवरून गुजर मजकूर यासि स्वामींनीं आणून, पारिपत्य करून दूर केला. तेव्हां पंत मशार निल्हेचा अंमल यस्थास्थित बसला.

तदोत्तर वर्षाभरानें चिमणाजी कृष्ण व त्यांची मातोश्री राधाबाई परशुरामास आली. यावयाचें कारण चिमणाजी पंताचे तीर्थस्वरूप कृष्णाजी बल्लाळ भागवत वडील बंधु, धाकटे नारो बल्लाळ, मौजे सोनवेडे तालुके संगमेश्वर येथील कुळकर्णाचे वृत्तीवर नांदत होते. कृष्णाजीपंतास पुत्र एक प्रथम संबंधाचे चिमणाजीपंत. द्वितीय संबंध राधाबाई. नारोपंतास पुत्र दोघे. संभाजी पंत व अंताजीपंत. कृष्णाजीपंत व नारोपंत उभयतां बंधु. दुसरें लग्न जाहल्यावर कृष्णाजीपंताचा काळ अविलंबेंच जाहला. कृष्णाजीपंताची वहीण ते बापूजीपंत तांबे यांची मातोश्री. धाकटे बंधु नारोपंत यांचाही काळ जाहला. उपरांत संभाजीपंत व अंताजीपंत उभयतां बंधु यांणीं विभक्त संसार केला. चिमणाजीपंताचें लग्न नाहीं. शरीर अशक्त.पोटांत संबंधाचे पीडेची तिडीक. सापत्न माता राधाबाई परंतु मोठी धीराची. कांहीं कोठें आश्रय नाहीं असें पाहून चिमणाजीपंत पुत्रव्यथित्स्थ घेऊन धामापूर नजीक देवरूख येथें येऊन श्रीची सेवा वहूत केली. तेव्हां श्रीनें कांहीं दृष्टांत दाखविल्यानंतर अन्न आच्छादन चिरंजीवाचें लग्न होणें आहे तें सर्व चित्तांत आणून, बापूजीपंत व चिमणाजीपंत हे आते मामे भाऊ परशुरामास गेल्यानंतर देवसेवेची वगैरे सोय घडेल, हें जाणोन चिमणाजीपंत व राधाबाई परशुरामास येऊन, बापूजीपंताचे विद्यमानें श्री स्वामींचे भेटीस घेऊन देवसेवेशीं राहिली. सहा महिने जाहलियानंतर बापूजी

---

१८. गळांठा =घोळा मोळा, अव्यवस्था.

पंताचें चिमणाजीपंताचें नातेंही श्रीस्वामींस समजलें. व चिमणाजीपंताची केवळ गरिबीची वृत्ति ध्यानांत आली. तदनंतर स्वामींनीं देवळाचें काम लाविलें होतें, तेव्हां चुन्याची तर्तुद पाहतां कोणी स्वामीस सांगितलें कीं, कोणी [?] महिपतिगडीं शिवाजी महाराज यांचे कारकिर्दीच्या चुन्याच्या भट्या आहेत. व खड्यांचे मोटमोठे ढीग पडले आहेत. तेथील सुभेदाराचे भेटीस स्वामी गेल्यास चुन्याचे खड्यांचें कार्य होईल. असें कळल्यानंतर स्वामींनीं महिपतगडास जावयास स्वारीची तयारी करून समागमें चिमणाजीपंतास घेतलें. आणखी दोघे वैदिक ब्राह्मण परशुरामकर चितळे वगैरे घेऊन चालिले. सुभेदारास प्रसाद द्यावयासि दोन नारळ स्वामींनीं घेतले ते चिमणाजीपंता जवळ दिले. आणि परशुरामाहून निघाले. मार्गीं चिमणाजीपंत व परशुरामकर ब्राह्मण स्नान केले. दोन प्रहर जहाले. ब्राह्मण क्षुधातुर होऊन चिमणाजीपंतास बोलिले तुह्मां जवळ नारळ आहेत ते भक्षावयासि देणें. गडास गेल्यावर दुसरे घेऊन देऊं. तेव्हां चिमणाजीपंतीं अनमान केलें. "श्रीस्वामी रागें भरतील. त्यांचे आज्ञे शिवाय देतां नये," असें बोलले. परंतु ब्राह्मण क्षुधातुर. "स्वामी मागतील तेव्हां देऊं विषय फार नाहीं" असें बोलून नारळ घेऊन भक्षिले. तदोत्तर गडास जातांच स्वामींनीं चिमणाजीपंताजवळ नारळ मागितले. दुसरा नारळ जवळ नाहीं तेव्हां उगेच राहिले. श्रीस्वामी रागें भरले. नारळ काय केले ह्मणून विचारलें. तेव्हां "मार्गीं ब्राह्मणांनीं भक्षिले दुसरे आणितों" ह्मणून बोलतांच फार कोप केला. "माझे आज्ञेशिवाय नारळ कसे दिले? तूं माझे उपयोगीं नाहींस. माघारे जाणें." ह्मणून आज्ञा केली. गालीप्रदानें केलीं. तथापि चिमणाजीपंतीं चित्तांत तिळमात्र विषमता न आणून मागती सेवेंत तत्पर राहते झाले. रात्रौ स्वामींनीं निद्रा केल्या नंतर जवळ जाऊन पाय चुरावयासि लागले. स्वामींनीं चिमणाजी पंत असें जाणून लत्ता मारून उठवून लाविलें. आणि निद्रा केली. क्षण एक जाहल्या नंतर मागती येऊन पाय चुरावयासि फिरोन लागले. मागती रागें भरून उठवून लाविले. याप्रमाणें तीन वेळां उठवून लाविले. आणि निद्रा केली. तों पहांटेची प्रहर रात्र राहिली. स्वामींस निद्रा लागली असें पाहून मागती येऊन पाय चुरीत बसले. अरुणोदय-समयीं स्वामी जागृत होऊन पाहतात तों चिमणाजीपंत पादसेवा करीत बसलेआहेत. तेव्हां स्वामी बोलिले, "दोन चार वेळां तुजला रागें भरून, शिवीगाळ करून, लाथा मारून उठवून लाविलें असतां फिरोन येऊन पाय दाबीत बसलास?" तेव्हां चिमणाजीपंतीं उत्तर केलें "मायबाप गणगोत स्वामींचे पाय. हे सांडून कोठें जाऊं? स्वा मी नि रा श्र य केल्यास आश्रय नाहीं" असें करुणावचन श्रवण करितांच स्वामींस

फारच कृपा येऊन समाधान केलें, "चिंता न करणें देव तुझें बरें करील." या प्रमाणें बोलून पहिल्या पेक्षां विशेष कृपा करावयासि लागले. समागमें परशुरामकर ब्राह्मण होते त्यांस बोलले "रात्रौ तीन चार वेळ चिमणाजीस रागें भरून घालविला असतां मागती सेवेशीं तत्पर, चित्तांत मळ नाहीं, गरीब आहे." महिपतगडचे सुभेदारानें स्वामींची पूजा करून आज्ञेप्रमाणें चुन्याचें काम केलें. नंतर स्वामी निघोन परशुरामास आले. चिमणाजीपंतास चार रुपये दरमहा करून पोत्याचें काम सांगितलें. बापुजीपंतास पांच रुपये दरमहा करून फडणिशीचें काम सांगितलें. तदनंतर स्वामींनीं धोंडोपंत सप्रे यांची कन्या मागोन चिमणाजीपंताचें लग्न केलें. लिहिणें कारभार दिवसेंदिवस अधिक होत चालिले.

त्याजवर बापूजीपंतास श्रीस्वामी बोलिले कीं, "तूं एकटा; कारखान्याचें लिहिणें व चिटणिसीचें लिहिणें फार पडतें. यास्तव आपले मायेचा फूट न पडे, काम चाले, ऐसा कारकून आणावा." यावरून धोंडो भास्कर तांबे गो रा नि- क ट ह रा मी सरदार कल्याणप्रांतें होता त्या जवळ होते. त्यांस पत्र पाठवून आणून स्वामीस भेटवून चिटणीशीचें काम सांगितलें. आणि पांच रुपये दरमहा केला. बापुजीपंत, चिमणाजीपंत, धोंडोपंत त्रिवर्ग एकरूपें—एक मायेनें श्रींचे सेवेंत तत्पर राहिले. स्वामींनीं शामला कडून पेढेंगांव दरोबस्त व आंबडस निमे इनाम करून घेतला. निमे आंबडस महिपतगड तर्फेचें राहिलें तें प्रतिनिधीकडून इनाम करून घेतलें. एकूण दोन्ही गांव प्रथम दरोबस्त इनाम करून घेतले. मौजे डोरलें व माहळुंगें तर्फ पांवस हे दोन्ही गांव निमे महिपतगड तर्फेनें शके सु॥ ** सालीं परशरामपंत प्रतिनिधी यांजकडून महाराज शाहूराजे यांचे मुद्रेनिशीं इनाम करून घेतले. शके * * * सुरुसन तिसा अशरचे सालीं मौजे गोठणें देवाचें तालुका राजापूर हा गांव दरोवस्त कान्होजी आंगरे सरखेल यांजकडून इनाम करून घेतलें. हपशी यवन होऊन

---

१९ तिस्सां अशरीन मय्यां व अल्लफ =१११९=इ० स० १७१८.

२०. कान्होजी आंग्रे—शिवाजीच्या वेळीं तुळाजी आंग्रे ह्मणून आरमाराचा एक अधिकारी होता त्याचा पुत्र कान्होजी. राजारामाच्या वेळीं सिधोजी गुजर हा आरमाराचा मुख्य सरदार असतां त्याच्या हाताखालीं दुय्यम. सरदाराची जागा कान्होजीकडे होती. हा मोठा चपळ असून शूर होता. मुंबई पासून तों तहद त्रावणकोर पर्यंत असणाऱ्या बंदरां पैकीं कान्होजीच्या तडाख्यां. तून बचावलीं अशीं थोडींच बंदरें होतीं. सिधोजीचे पश्चात् तो आरमाराचा मुख्य सरदार झाला. पुढें ताराबाईचा पक्ष घेऊन शाहूशीं भांडत असतां त्यास बाळाजी विश्वनाथानें फाडून शाहूचा अंकित केलें. [पेशव्यांची बखर पृ० ११–१२ पहा.] मरणकाळ सु० १७२८.

# ब्रह्मेंद्र स्वामींचें चरित्र.

श्री स्वामींस गांव इनाम देऊन आज्ञेंत तत्पर हे कान्होजी आंग्रे यांणीं पाहून त्या पेक्षां अधिकोत्तर स्वामींचे ठायीं निष्ठा धरून गांवसीव देऊन इमारतीचें कामास भिक्षा नक्त ऐन जिन्नस जे स्वामींची आज्ञा येईल ते शिरसा वंद्य करून साहित्य पुरवावें. त्रिंबक कृष्ण मोघे राधाबाईचे बंधु व संभाजी नारायण चिमणाजी पंताचे चुलत बंधु सुवर्णदुर्गी आंग्रे यांजकडे चाकरीस होते. ते नात्यामुळें आणून त्रिवर्गांनीं स्वामींस विनंती करून चाकरीस ठेविलें. त्रिंबकपंतास चार रुपये दरमहा करून मौजे गोठणें येथें ठेविलें. संभाजी नारायण यास चार रुपये दरमहा करून स्वामींनीं आपले संनिध सेवेसि ठेविलें. मागाहून अंताजी नारायणही नात्यामुळें आले. त्यांसही चार रुपये दरमहा करून मौजे आंबडस येथें घर बांधून ठेविलें. मौजे मजकूरीं बाग होती तेथील देखरेख व जावसाली कागदपत्र न्यावे. जें कामकाज पडेल तें करावें.

दिवसें दिवस इमारत कारखाना श्रीस्थळीं मातबर चालिला. धर्मशाळा, पोंवळी[21], दीपमाळा, श्रीरेणुकेचें[22] देवालय, गणपतीचें देवालय, मारुतीचें देवालय, मुख्य श्रीचें देवालय याचा तिसरा घुमट, व पुढें लांकडी मंडप हीं कामें स्वामींनीं केलीं. पहिली कांहीं इमारत देवालयही नव्हतें. देव मात्रजीर्ण देवालयांत होता व बाणगंगेचीं तळीं पुरातन होतीं. तेव्हां दाभोळमध्यें[23] *बतू साहेब ह्मणून यवनी होती तिचें जहाज बहुत दिवस समुद्रांत कोणे बंदरीं गेलें तें फिरोन येईना. आहे नाहीं हें वर्तमान कळेना. तिजला कोणी ह्या देवाचा चमत्कार सांगितला. तेव्हां तिनें परशुरामीं येऊन देवास नवस केला जे, माझें जहाज बहुत दिवस येत नाहीं तें स्वस्तिक्षेम आल्यास तुझें देवालय बांधीन. ह्मणून नवस केला. त्याजवर अविलंबेच जहाज दाभोळेस दाखल जाहलें. मालमत्ती[24] बहुत आणिली. तेव्हां तिनें नवस केल्या प्रमाणें देवाचें देऊळ दोन घुमट मात्र बांधिले होते. वरकड रेणुका आदिकरून कांहीं नव्हतें तें सर्व रचना स्थापना स्वामींनीं केल्या. ब्राह्मणांची वस्ती देवाजवळ स्वामी तेथें राहिल्यावर होत चालिली. देवा जवळ गुरवाचें मात्र घर होतें. पूजेला ठेविलेले ब्राह्मण हवशी यांचे दहशतीमुळें परागंदा होते, ते स्वामींनीं सर्व देवा जवळ आणिले. परशुरामकर ब्राह्मणांनीं पेढें येथील शेतीकडील कुणबावा

---

२१ पोंवळी = देवळाच्या आवारा सभोंवतालची भिंत.

२२. रेणुका = ही परशुरामाची माता

२३. दाभोळ = हें विजापूरकर आदिलशहा ह्याचे वेळीं मोठें भरभराटीचें बंदर होतें. येथें मोठमोठ्या मशीदी अद्यापआहेत.

* बतुल (?) बडी (?)

२४. मालमत्ती = मालमिळकत.

करून ऐनगल्ला श्रीस्वामींचे कोठीस दाखल करावा याप्रमाणें वहिवाट चालली.

स्वामींचा वार्षिक नियम, परशुरामाचे पश्चमेकडे अरण्यांत नदीचा*ओढा म्हणून आहे तेथें लहान गुंफा हाम चौरस तीन हात जाग्याची करून श्रावणमासीं एकवीस दिवस पर्यंत एकासनीं जप करीत समाधिस्त वसावें. लहानद्वार आंत जावयासि ठेविलें होतें तें वाहेरून चिनून टाकावें. एकविसावे दिवशीं भाद्रपद शुद्ध चतुर्थीस वाहेर निघावें. ते दिवशीं आंग्रे यांजकडील कारकून व दोन तीनशें माणसें वरकंदाज† स्वारी यावी. त्याज प्रमाणें हवशी याजकडील अंजनवेल गोवळ [कोट] येथून कारकून स्वारी सुद्धां यावे. उभयता आंग्रे हवशी यांचे लोकांनीं ते दिवशीं निर्वैर होऊन स्वामींचे सेवेशीं तत्पर असावें. गुंफेंतून निघोन स्वामी परशुरामास येते समयीं डावे वाजूस §शामलाचे कारकून व स्वारीचे लोक वरकंदाज यांणीं वार सोडीत चालावें. त्या प्रमाणें उजवे वाजूस आंग्रे यांजकडील स्वारीचे लोकांनीं चालावें. याप्रमाणें समारंभें करून परशुरामीं देवासन्निध येऊन रात्रौ कीर्तनादि उच्छाह करून दुसरे दिवशीं ब्राह्मण-भोजन व आंग्रे हवशी यांजकडील झाडून लोकांस जेवण घालून निरोप द्यावा. या प्रमाणें वार्षिक नियम चालला. मौजे गोटणें येथें भार्गवाचे देवळाचें पूर्णगर्डी देवळाचें काम लाविलें.

शाहू महाराज दिल्लीहून औरंगजेव[25] याचा निरोप घेऊन सातारप्रांतें चंदनवंदन किल्ले या नजीक फौजेसुद्धां राहून सातारियावर परशुरामपंत ताराबाईचे निसवतीनें शेखमिरा व परशराम त्र्यंबक होते. त्यांणीं शाहू महाराज यांसि फिरावून गोष्ट सांगितली. किल्ला न देत. तेव्हां शेखमिरा यांचीं मुलें मनुष्यें वाईत होतीं त्यांची वातमी लावून, स्वारी पाठवून, धरून आणून, किल्याखालीं नेऊन मारावयाचा हुकूम महाराजांचा जाहला. हें वर्तमान किल्यावर शेखमिरी[26] यास कळल्यानंतर अनुसंधान लाविलें जे "परशरामपंतास कैद करून किल्ला महाराजांस देतों." ऐसा करार करून सर्व शिवंदीचा फितूर करून स्नानसंध्येचे समयीं शेखमिरा यांणीं परशरामपंतास कैद करून, महाराजांचें निशाण किल्यावर घेऊन परशरामपंतास घेऊन महाराजांकडे आले. शेखमिरा यास[27]सर्फराज करून परशरामपंतास महाराजांनीं वेडी घालून गदाधरभट दिल्ली-

* नदीचा ?—जही (दी) चा ?

† वरकंदाज =चापाची बंदुक वाळगणारे

§ शामल =यवन. हवशी.

२५ औरंगजेबाच्या मनांत शाहूस मुक्त करावयाचें होतें. तो मरण पावल्यावर त्याचा पुत्र अझिमशहा याणें त्यास मुक्त केलें.

२६. शेखमिरा–यांचे वंशज अद्याप वाईस आहेत.

२७. सरफराज =सरफराजी =पोषाख वगैरे देऊन खुषी करणें.

तील पूर्व-समागमी जाणोन प्रतिनिधीचें पद त्यांस दिलें. भट्टी कारभार, यथास्थित बंदोबस्त न होय हें लक्ष महाराजांनीं समजोन परशरामपंत कैदेंत असतां महाराजांचे खर्चाविचांचें साहित्य केलें. न्यून पडों दिलें नाहीं. पदायोग्य मनुष्य जाणोन महाराजांनीं कृपा करून परशरामपंतास प्रतिनिधीची वस्त्रें[२८] दिलीं. बहिरोपंत पिंगळेयांसि पेशवाई होती. बाळाजी विश्वनाथ चंद्रसेना कडून महाराजांकडे आले ते कर्ते, उमदे पाहून सय्येदांचे[२९] कुमकेस दिल्लीस फौज सुद्धां जाण्याची आज्ञा केली. ते समयीं बाळाजीपंतीं विनंती केली, "आज्ञे प्रमाणें जातों. परंतु कांहीं एकपद असल्यास फलाणे महाराजांकडोन कुमकेस आले हा लौकीक महाराजांचा आहे." ऐसी विनंती ऐकून पूर्वील पिंगळे पेशवे यांजकडून पेशवाई काढून बाळाजीपंतास पेशवाईची वस्त्रें देऊन रवा[३०]नगी केली.

ऐसें जाहल्या नंतर सनें खमस अशरीनांत[३१] श्रीस्वामीघाट चढोन साताऱ्यासि शाहू महाराज यांजकडे आले. राजश्रींस वर्तमान कळतांच सामोरे जाऊन सन्मानें करून वाड्यांत आणून, पूजा करोन तीनगांव * * * मौजे धावडशी तर्फ परळी, व मौजे विरमोड प्रांत कऱ्हाड व मौजे अनेवाडी तर्फ कुडाळ हे तीनगांव राजांनीं दरोबस्त कुलबाब कुलकानू[३२] इनाम देऊन राजपत्रें करून दिलीं. बाळाजी विश्वनाथ प्रधान यांसि पिंपरी गांव देण्याविषयीं आज्ञा केली. त्यांणीं पूर्वील स्वामींचा आशीर्वाद स्मरोन अधिकोत्तर निष्ठा धरोन आपले जिल्हेंतील गांव मौजे पिंपरी प्रांत तर्फ कढेपठार हा गांव दरोबस्त राजपत्रीं इनाम करून सन सीत अशरीन[३३] मध्यें दिला. मौजे विरमोड येथील देखरेखीस हरी टिळक ह्मणून ब्राह्मण होता तो ठेविला. मौजे अनेवाडी येथील देखरेखीस नानो [जानो?] महादेव जोसी मौजे मजकूर यासि सांगितली. मौजे धावडशी येथें बाळाजी हरी अंतरकर ठेविले. पुढें त्यापासून सेवेशीं अंतर पडल्यानंतर सन शीत अशरि-

२८. परशरामपंतास १७१३ मध्यें मुक्त केलें. परंतु त्याचे वडील पुत्रानें फितूर केल्यामुळें त्यास पुनः कैदेंत घातलें. नंतर धाकट्या चिरंजिवांनीं पराक्रम करून. शाहू राजास खुष करून. बापाचा सुटका करविली.

२९ सय्यद हुसेनखान दक्षणेचा सुभेदार पे० ब० पृ० १६ टी० २० पहा.

३०. पेशवाईचें पद आंग्रे याचा हल्ला फिरविल्यावर पूर्वींच दिलें होतें पे० ब० पृ० १४ टी० १४ पहा.

३१. खंमस अशरीन म० अ० = ११२५ = इ० स० १७२४.

३२. कुलबाब कुलकानू = सर्व प्रकारचे कर व पट्ट्या वसूल करण्याच्या व कायदा बजाविण्याच्या हक्का सुद्धां

३३. सीत अशरीन = ११२६ = इ० स० १७२५ ह्या पूर्वीच बाळाजीपंत वारले होते. तेव्हां हा गांव बाजीरावानें दिला असावा.

नांत परशुरामींहून संभाजीपंत धावडशीस पाठविले. सन सैवां इशरिनांत सावनूर बंकापूर येथील पठाणानें हबशी सिद्दी[३५] सात अंजनवेल गोवळकोट येथें होता, त्यास हत्ती दिल्हा. परंतु परराज्यांतून हत्ती निभावून कोकणांत नेणें हि गोष्ट हबशी यासि न घडे. तेव्हां त्याणें स्वामींस पत्र लिहिलें जे, "आपली आज्ञा सर्व राज्यांत मान्य आहे. यास्तव वर घाटें आपा जोशी पाठवून, पंत प्रधान व पंत प्रतिनिधी यांचीं दस्तकें[३६] आणून द्यावीं" त्याचें उत्तर स्वामींनीं दिलें जे, "आह्मांस भिक्षार्थ सावनूर प्रांतीं जाणेंच आहे. तुमचे काय हत्ती असतील ते समागमें येतील. कोणाचे दस्तकाचें प्रयोजन नाहीं." या प्रमाणें सिद्दी सात यास उत्तर गेल्यानंतर दहा पठाण हत्ती आणावयासि स्वामीं समागमें जावयासि पाठवून दिले.

याजवर स्वामी सावनूर प्रांतें स्वारीस जावयाची तयारी करून समागमें खंडोजी साळवी व अंताजी नारायण व दाद गुरव व कर्णेकरी, निशाणदार वगैरे माणसें समागमें घेऊन सावनूर बंकापूर प्रांतें जाऊन सर्व प्रांताची भिक्षा घेऊन, सिद्दी सात यांजकडील पठाण पत्र सावनूरवाल्याकडे पाठवून हत्ती घेऊन मार्गी सांभाळून आणिला. तो विशाळगडचे घाटीं चौकीदारांनीं अटकाविला. तेव्हां स्वामींनीं किल्यावर अधिकारी यासि पत्र पाठवून हत्ती सोडविला. घाट उतरून कोकणांत मा ख ज ना स आले तों तेथें आंग्रे यांजकडील व हबशी यांजकडील चौकीचे लोक होते. आंग्रे यांजकडील लोकांनीं साफी करून जयगडाची स्वारी आणून हत्ती घेऊन चालिले. हबशी यांजकडील शें दोनशें माणसें चौकीवर होतीं, त्यांची व आंग्रे यांजकडील जयगडाचे स्वारीची लढाई जाहली. जयगडाचा जमाव भारी, त्यामुळें हत्ती घेऊन जयगडास गेले. हत्ती समागमें स्वामी नव्हते. स्नानसंध्येस मार्गी दोन प्रहरां उतरून हत्ती पुढें मा ख ज नीं मुक्कामास पाठविला. स्वामी मागाहून येत तों अगोदरच जयगड करी हत्ती घेऊन गेले [होते].

ही बातमी हबशी याजकडील लोकांनीं गोवळकोटीं सिद्दी सात यास पाठविली जे, "गोसावी [यांणीं] हत्ती समागमें आणून मखजूनेच फडावर क[ला]चें निमित्य करून आंग्रे यांचे लोकांचे स्वाधीन हत्ती केला." ऐसी बातमी जातांच हबसी याची जात अविवेकी, परम विषम चित्तांत मानून, सिद्दी सात याणें गोवळकोटींहून स्वारी तयार करून, दोन तीनशें पठाण शिवरात्रीचे दिवशीं परशुरामास पाठवून

३४ सवां अशरीन = ११२७ = इ० स० १७२६

३५ मजकुरांत याच ठिकाणीं "सैद दिसांत" असें आहे तो हस्तदोष आहे.

३६ दस्तक = परवाना. पास.

ब्राह्मणांची व कारकुनांची व कारखाने यांचे लोकांचीं झाडून घरें जप्त करून, मोठा उपसर्ग करून वस्त वा क स र्ग[37] गोवळकोटास नेलें व इमारतीचें द्रव्य होतें [तें] व देवाची वस्तवानी, वस्त्रें सर्व गोवळकोटीं नेलें. कारकून होते त्यांतून ठरून राहतां चिमणाजी कृष्ण व बापूजी राम व लखमाजी कोठीवाला तिघेजण मात्र तळावर राहिले. वरकड माराचे भयेंकरून प्राण रक्षणार्थ सर्व पळून गेले. त्रिवर्गांची आब्रू घेऊन प्राणाशीं गांठ घातली. आयुष्य मर्यादेस्तव प्राण मात्र कुडींत राहिले "गोसांवी यांची ठेव रेव तुझे स्वाधीन आहे ती दाखविणें," ह्मणोन चिमणाजीपंताचे फार हाल केले. देवळांत पठाण हबशी शिरोन द्रव्य ठेविलें असेल ह्मणोन देवा भोंवतें चौगिर्दा[38] परस्परच खळ्या खणोन पाहिलें. तेथें द्रव्य कोठून असणार? कांहीं बंदही धरून नेले. या प्रमाणें दुष्टानें स्थळ उद्ध्वस्त[39] केलें.

माखजनीं स्वामी आले तों जयगड करी यांणीं हत्ती नेला हें वर्तमान ऐकतांच तेथील हवालदारास पत्र पाठविलें त्यांणीं उत्तर पाठविलें जे "स्वामींनीं समागमें हत्ती आणिला हें आह्मांस कळलें नाहीं. हबशी याचा हत्ती जाणोन कैद करून आणिला परंतु आतां सरखेलांची[40] आज्ञा जाहलि या शिवाय सोडिला तरि आमचें पारिपत्य होईल. स्वामींनीं कुलाबियासि[41] पत्र लिहून, हत्ती सोडणें ह्मणोन आमचे नांवें चिटी आणवावी आणि हत्ती न्यावा." तेव्हां स्वामींनीं कुलाबियासि कान्होजी आंग्रे सरखेल यांसि पत्र पाठविलें कीं, "तुमचे लोकांनीं आमचे समागमें हत्ती होता तो नेला सबब सिद्दी सात शामल[42] याणें परशुरामीं स्वारी पाठवून, देव ब्राह्मणाचा उच्छेद करून, वस्तवानी जप्त करून, बंद धरून[43] नेला. कारकुनांस मारहाण करीत आहे, तरि पत्रदर्शनीं जयगडकरी यास पत्र पाठवून हत्ती सोडवून देववणें. हत्ती न सोडल्यास तुझें कल्याण होणार नाहीं" असें स्वामींचें पत्र सरखेलास जातांच जयगडकरी यास चिटी दिली जे, "बेदिकत हत्ती बावा स्वामींचे स्वाधीन करणें." त्याजवरून हत्ती सोडला.

---

३७. वस्तवानी सर्व (?)

३८. चौगिर्दा=चौगर्दा=चोंहीकडे, सभोंवती, सर्वतः

३९. हिंदूंच्या देवस्थानांचा विध्वंस मुसलमान कसा करीत याचा हा एक छोटासा मासला आहे.

४०. सरखेल–हें उपपद आंग्रे यांस होतें. सर्खेल="निशाणांच्या समूहाचा अधिकारी" राज्यव्यवहार कोश.

४१. कुलाबा–अलीबागे जवळ–हा किल्ला आंग्रे यांचें आदिपीठ.

४२. 'न वि दिसांत शाम' असें मूळांत आहे.

४३ बंद धरून–बंध धरणें=बांधून ठेवणें. अटकेत ठेवणें. भा० ब० ९, १३० टी० ५६ पहा.

तों समागमें घेऊन माखजुनाहून एक मजल हत्ती घेऊन स्वामी आले हें वर्तमान सिद्दीसात यास कळतांच परम लाचार होऊन जामीन घेऊन बंद सोडिले. परशरामास तबीबें, औषधें, मलमें कारकुनाकडे वरें करावयासि पाठविलीं. दो चौ रोजांनीं श्री स्वामी हत्ती घेऊन गोवळकोटास आले तों सिद्दी सात ह्यानें हात जोडून, अन्यायी ह्मणोन, श्री स्वामींस अर्ज केला. "तकसीर माफ करावी" असें बोलून चीजवस्त नेली होती ते आणून दिली. श्री देवाचीं तीन पदकें, जडावाचीं नेलीं होतीं तीं मात्र ठेविलीं. स्वामी सिद्दीस बोलिले "तुझा हत्ती आह्मीं आणिला तो घेणें. तूं अविचार करून देव-ब्राह्मणांचा उच्छेद केला अत:पर तुझा ही उच्छेद लवकरच होईल." असें बोलून परम रोष करून निघोन परशुरामास आले. देवळांत यवन शिरोन गर्ता खणिल्या, चिमणाजीपंत, बापूजी पंत, कोटिवळा यांचे मारामुळें कंठगत प्राण व इतर ब्राह्मण शूद्र सर्वत्रांस त्रास देऊन स्थळ उद्वस्थ केलें, हें अवलोकन करून चित्तास अधिकच संताप होऊन राजपुरीस सिद्दी सात याचा धनी याकुदखान याजकडे जाऊन बहुत क्रोधयुक्त शापोक्ति वदले. ती श्रवण करून सिद्दी सात याची अविचारी वर्तणूक ध्यानास आणून याकूदखान यानें बहुत प्रकारें विनंती केली जे, "मजला न विचारितां हें कर्म सिद्दी सात याणें केलें त्याचें पारिपत्य करितों. जें नेलें असेल तें माघारें देववितों. स्वामींनीं स्वस्थ चित्त करावें. गुन्हा माफ करावा." स्वामी बोलिले, "तुह्मी हबशीलोक बेइमान, अविचारी तुमचे राज्यांत राहणार नाहीं. अत:पर तुमचें कल्याण नाहीं." या प्रमाणें स्वामींचें भाषण ऐकोन खान याणें सिद्दी सात यास जरब पत्र लिहिलें जे, "मुल्कीं गो फकीर लोक यांचें बहुत प्रकारें आह्मी चालवीत आलों. पुढेंही ज्यादा चालविणें अवश्यक असतां त्यांचे दरगियास स्वारी पाठवून, तसनस करून, चीजवस्त नेली. याचें कारण काय. उपरि देखत पत्र यांची परशरामींहून चीजवस्त जराबाजेरीं सुतळीचा तोडा आदि करून, झाडून माघारीं देऊन, पावती घेऊन हुजूर पाठविणें. दिक्कत करून, दिसगत केलियासि तुझा बळेजा होणार नाहीं. तंगकरी देऊन पारिपत्य होईल." ऐसी ताकीद गेल्या नंतर झाडून चीजवस्त परशुरामास पाठविली. आणि देवाचीं पदकें आपण ठेविलीं होतीं तीं हुजूर राजपुरीस पाठविलीं

४४. बंद सोडला = कैद केलेले लोकांची सुटका केली.

४५. तबीब = शस्त्रवैद्य "तबीबस्तु भवेद्वैद्य:" रा० व्य० को०

४६. 'तुला गोफगीर' असें मूळांत आहे.

४७. जराबाजरा = किरकोळ सामानसुमान.

४८. दिक्कत = तकरार.

४९. बळजा = मुलाजा, क्षमा ?

५०. तंगकरी = तगेरी = फांटा देणें, पदच्युत करणें.

आणि पत्र लिहिलें जे "हीं पदकें साहेबां योग्य जाणोन हुजूर पाठविलीं आहेत. वरकड चीजवस्त परशरामीं पावती करून पावती घेऊन पाठविली आहे. पावती व पदकें येतांच खान यांणीं स्वामींचे पुढें येऊन, तकसीर माफ होणें ह्मणोन अर्ज केला. त्याजवर स्वामी याणीं तीं पदकें याकुदखानास देवाचीं पदकें सिद्दी सात याणें काढून नेऊन उपभोगार्थ ठेविलीं, तीं देवाचे कार्याचीं नाहींत तुह्मीं आपले पुत्रांस देणें" ह्मणोन सांगोन निरोप घेऊन निघाले. याकुदखान पैंय उतारा समागमें तरी पर्यंत येऊन, तकसीर माफ करून तकियो[५१] न सोडावा हे विनंती वारंवार करून आज्ञा घेऊन माघारे गेले.

श्रीस्वामी परशुरामास आले. शांमल[५२] दुष्टबुद्धी बेइमान हें चित्तांत आणून सन समानअशरीनामध्यें[५३] मार्गशीर्ष मासीं आगोदर श्रीदेवाची वस्तवानी वगैरे होतें तें किल्ले रसालगड * येथें नेऊन ठेविलें. उपरांत कारकून मंडळी कबिले[५४] सुद्धां स्वामींनीं धावडसीस रवाना केली. आपण सडे मागें परशुरामीं राहिले. कारकुनांचे कबिले हबसी यासि बातमी कळेल ह्मणोन उत्तर रात्रीस परशुरामाहून बाहेर काढून चिमणाजीपंताचे पुत्र जगन्नाथपंत साहा सात वर्षांचे स्वामींनीं आपले खांद्यावरून अर्धकोश पर्यंत परशुरामा पासोन आणून मार्गस्त करून माघारे गेले. धावडसी मध्यें चौसोपी वाडा बांधून दिला. त्यांत चिमणाजीपंत व बापूजीपंत व धोंडोपंत यांस ठेविलें. अंताजी नारायण यासि वीरमाडे अनेवाडी येथील देखरेख सांगितली. गांवगन्ना कारकून देखरेखीस ठेविले. त्याणीं गांवावर जिकडील रोखे ‡ होते तिकडे जाऊन मैंनाचिठी[५५] आणावी. रखवाली करावी. वरकड कामकाज गांवचे हिशेब चौकशी खंडणी करणें व § अखत्यारी त्रिवर्गाकडे. श्रीस्वामी मागाहून धावडसीस येऊन सर्व बंदोबस्त करून धावडसीचे तळ्याचें काम लाविलें. श्रावणमासीं समाधीस परशुरामास जावें याप्रमाणें कांहीं दिवस चालिलें.

पुढें सन ईसनेसल्लासीनांत[५६] रसालगड प्रांतें सन सल्लास सलासिनांमध्यें[५७] श्रीनिवास परशराम प्रतिनिधी फौजसुद्धां पारघाट उतरून माहाड घेतलें. आणि

५१. तांकया=स्थान, ठिकाण (फकीर, योगी यांचें.)

५२. शामळ=यवन.

५३. समान अशरीन=११२८=इ० स० १७२७

* 'सोनगड' कोल्हापुर प्रतीचा पाठ. ह्या प्रतीची हकीगत पुढें येईल.

५४. कबिला=कुटुंब, बायका.

‡ 'जिकडील हाताळ तिकडे जाऊन' को० प्र०

५५. मना चिठी=अवरोधपत्र, ज्यांचे रोखे त्यांचा अंमल बंद करण्याविषयीं लेख.

§ 'हा अकत्यार त्रिवर्गाकडे' को० प्र०

५६. इसन्ने सल्लासीन=११३२=इ० स० १७३१

५७. सल्लास सल्लासीन=११३३ इ० स० १७३२.

हबसी सिदीसात याचें पारपत्य करून अंजनवेल, गोवळकोट हस्तगत करावें ह्मणोन परशुरामीं येऊन मुक्काम करून राहिले. बाजीराव प्रधान व फत्तेसिंग भोंसले यांणीं राजपुरीवर मोहीम करून सन आर्बासल्लासिनांत रायगड घेतला. राजपुरीचे लोकांचे काबिले धरून जेर करून ध्यावी तों फत्तेसिंग भोंसले आपलें निशाण चढवणार हें समजल्यानंतर पंतप्रधान यांणीं खंडणी घेऊन जंजिरा हबसी याजकडे राखिलें.[५८] श्रीमंत राव प्रतिनिधी परशुरा[५९]मास गेले.

श्रीस्वामी निघोन धावडशीस येऊन राहिले. गणेश बल्लाळ नांवे कारकून परशुरामीं देखरेखेस ठेविले. सल्लास सल्लासिना पासून श्रावण मासींची समाधी श्रीकृष्णातीरीं विरमाडें याचे रानांत मठ बांधून घेतला. तेथें सलास सलासीना मध्यें मौजे अनेवाडी व कसबे निंब यांत शिवेचा कज्या लागला. तेव्हां श्रीस्वामी अनेवाडीचे रानांत कृष्णातिरीं फत्तेबागांत निकर्ष[६०] करून बसले. निंबकरांस थोरली देवडी विरुबाईची हिमायती[६१]मुळें अनेवाडीकर गरीब पाहून शींव रेटावी, हा मजकूर केला. श्रीस्वामीं-नीं निकर्ष करून शिवेवर बसले. महाराज शाहू राजे यांणीं ऐकोन स्वामीं-चे दर्शनास फत्तेबागांत येऊन निंबकरांस नशद * करून पूर्वील शींव करार करून दिली. त्या शिवेवरून स्वामींनीं आंब्याचीं झाडें लाविलीं. महाराजांनीं श्रीस्वामींस पालखी देऊन सन्मानें करून धावडशीस घेऊन आले. सन औव्वलसलासिना[६२]मध्यें मौजे माळशिरस प्रांत सुपें हा गांव दरोबस्त कुळबाब कुळकानु इनाम राजे छत्रपती यांणीं दिला. सन खमैस[६३] सलासिनामध्यें महाराज महाल[६४]सुद्धां प्रतापगडास श्रीचे[६५] दर्शनास गेले. येते समयीं धावड-

---

५८ प्रतिनिधि व भोंसले यांणीं रायगड १७३५ मध्यें घेतला व पेशव्यांनीं तळा घोसाळा वगैरे मुलुख घेऊन राजपुरीहून जंजिऱ्यावर मोरचे सुरू केले. ग्रां॰ ड॰

५९. ज्या ज्या वेळीं राजपुरी मराठ्यांच्या हातीं लागली त्या त्या वेळीं त्यांणीं तेथें मोरचे उभे करून जंजिऱ्यावर तोफा सुरू कराव्या. असा क्रम शिवाजी पासून चालला होता. पण त्यापासून तादृश उपयोग होत नाहीं हें पाहून व दुसरीकडे लक्ष देण्याचें जरूर आहे हें मनांत आणून बाजीरावानें तह केला. त्या तहानें ११ महाल व तळा घोसाळा, बिरवाडी, रायगड, अवचितगड हे किल्ले व महाड इतका मुलुख सिद्दी कडून मराठ्यांस मिळाला.

६०. निकर्ष=हटयोग, उग्रतप.

६१. विरूबाई=ही शाहूची ज्येष्ठ पत्नी असें वाटतें. हिमायत=फूस, पाठबळ, वशिला.

* "निषेध" को॰ प्र॰

६२. अर्बा सल्लासीन=११३४=इ॰ स॰ १७३३.

६३. खंमस् सल्लासीन=११३५=इ॰ स॰ १७३४.

६४. महाल=अंत:पूर, राणीवसा.

६५. श्रीचे=देवीचे. तुळजा पुरची भवानी ही भोंसल्यांची कुलस्वामिणी. इणेंच शिवाजीस दृष्टांत दिल्यावरून त्याणें प्रतापगडावर तिची स्थापना केली. शिव छत्रपतींचें चरित्र पृ॰ २१ पहा.

शीस येऊन तीन दिवस मुक्काम करून राहिले. माळशिरस गांवचा इनामतीचा कागद हातरोखा शाहू महाराजांनीं करून दिला. छ २२ मोहरम सन तिसांसल्लासिनांत[६६] महाराज छत्रपती महालसुद्धां मिरजेस मसलतीमुळें[६७] गेले. त्याच सालीं विरमाडेकर पाटील व अंताजी नारायण यांची कटकट होऊन विरमाडेकर महालांत वीरूबाईकडे फिर्याद जाहले. अंताजी नारायण गांवांत येऊन वगैरे लिहून घेतले. श्रीस्वामी मिरजेस गेले. तेथून आल्या नंतर सन इहिदे अर्बैन[६८] ज्येष्ठ वद्य ४ छ १७ शके १६६२ दुर्मती संवत्सरीं जमादिलावलीं चिमणाजी कृष्ण यास देवआज्ञा जाहली. तदनंतर सर्व कारभार जगन्नाथ चिमणाजी यासि स्वामींनीं सांगितला. आपण अगत्य अगत्य देखरेख करीत. मिरजेहून महाराज आलियावर सन इसनेअर्बैनांत पौषमासीं साहेब विरूबाई यांचा काळ जाहला. बाजीराव प्रधान यांचा काळ सन अर्बैन शके १६६२ रूद्रसंवत्सरीं वैशाख शुद्ध २ सि* जाहला. चिमणाजीआपा व बाळाजी बाजीराव सातारियासि महाराजांकडे आले. बाळाजी बाजीराव यांसि पेशवाईचीं वस्त्रें सन इहिदे अर्बैन भाद्रपदमास[ शके १६६२ ] जाहलीं. वस्त्रें जाहल्या नंतर आपा व नाना प्रधान धावडशीस स्वामींचे दर्शनास येऊन, प्रसाद वस्त्रें घेऊन, निरोप घेऊन गेले. श्रीस्वामींनीं जगन्नाथ चिमणाजी यांस पेशवे यांस सांगून किल्ले पुरंधर येथें पेशजी सनद दोनशें रुपयांची असामी करून दिली. सन इहिदे असैना [?] मध्यें जास्ती १०० रुपये तैनात करार करून ऐन तीनशें रुपयांची असामी पुरंधरीं दिली व सन मजकुरीं येशवंतराव पवार यांजकडे दीडशें रुपयांची असामी करून जगन्नाथपंतास दिली.

नंतर बावांचे आज्ञे प्रमाणें जगन्नाथ चिमणाजी कारभार करूं लागले. श्रीस्वामींचा काल पुढें होणार तों अगोदर आठ नऊ महिने भविष्य स्वामींस समजलें. तों एके दिवशीं शाहू महाराज श्रीचे दर्शनास आले. तों श्रीस्वामी धावडशीचे तळ्यावरील मठांत जप करीत बसले होते. तों शाहूराजे दर्शनास आले हें वर्तमान ऐकतांच स्वामी आसनावरून उठोन गुप्त जाहले. महाराज गांवांत येतांच जगन्नाथपंत पुढें जाऊन भेटले. महाराजांनीं जगन्नाथपंतास विचारलें स्वामी कोठें आहेत ! तेव्हां जगन्नाथपंतीं सांगितलें जे श्रीस्वामी मठांत तप करीत आहेत. त्याजवर महाराज व जगन्नाथपंत

---

६६. तिरसां सल्लासीन = ११३९ = इ० स० १७४८.

६७. मसलत = राज्य कमाविण्याचा बेत, मोहीम. ही मसलत कोणती?

* 'द्वादशीस' को० प्र.

६८. इहिदे अर्बैनांत. = ११४१ = १७४० इ० स०

स्वामींचे मठांत आले तों स्वामी मठांत नाहींत. आसन मात्र ठिकाणावर आहे. असें पाहून शाहू महाराज परम साशंक होऊन जगन्नाथपंतास बोलिले जे "स्वामी मठांत जप करीत आहेत असें तुह्मीं सांगितलें आणि स्वामी तों तेथें नाहींत याचा अर्थ काय! आह्मी स्वामींचे दर्शनास आलों आणि स्वामी दर्शन देत नाहीं हें काय?" तेव्हां जगन्नाथपंतीं विनंती केली जे, " मी आपल्याकडे आलों ते समयीं स्वामी मठांत जप करीत बसले होते, त्यावरून महाराजांस विनंती केली जे, स्वामी मठांत आहेत. आतां कोठे गेले समजलें नाहीं. शोध करितों." ह्मणोन जगन्नाथपंत मठा बाहेर येऊन बागांत व गांवांत शोध केला. परंतु कोठें शोध न लागे. तेव्हां माघारे येऊन महाराजांस विदित केलें. स्वामींचा शोध लागत नाहीं. तेव्हां राजे बहुत श्रमी खिन्न होऊन विचार करून सर्व मुच्छदी व सैन्यास आज्ञा केली जे, "स्वामींचे दर्शना कारितां आह्मी आलों आणि स्वामी दर्शन देत नाहींत त्यापेक्षां येथें आमचें राहावयाचें कारण काय?" असें बोलून भालदारास सांगोन संपूर्ण समागमी लोक सारे गांवाबाहेर लाविले. एक पालखी व दोन खिजमतगार आपणा जवळ ठेवून गांवांत एका कुणब्याचे घरीं गुप्तरूपें बसले आणि जगन्नाथपंतास बलावून सांगितलें. जे, "आह्मी गांवांतून गेलों असें कळल्या नंतर स्वामी मठांत येतील. ते बातमी तुह्मी राखून, स्वामीस भेटून, खुलासा चित्तांतील कसा काय हें समजोन आह्मांस येऊन सांगावें. आह्मी गांवांत आहों असें स्वामीस कळूं न देणें. माघारे गेलों असें सांगावें." असें जगंनाथपंतास महाराजांनीं सांगितलें. त्याजवर चार सहा घटिका जाहल्या नंतर स्वामी मठांत येऊन आसनावर बसले हे बातमी राखून जगंनाथपंतीं येऊन स्वामीस विनंती केली कीं, " राजे आपले दर्शनास आले होते. त्यांस दर्शन न द्यावयाचें कारण!" असें जगंनाथपंताचें वचन ऐकोन, स्वामी बहुत रोष करोन बोलिले जे, "राजा माझे भेटीस येतां नये." तेव्हां जगंनाथपंतीं विनंती केली जे, " असा राजेश्री पासून काय अपराध घडला आहे? [कीं] स्वामी त्यांस दर्शन देत नाहींत." त्यास स्वामी बोलिले जे, राजानें कोंकणांत धानवली गांव इनाम दिला तो तुळाजी आंग्रे यानें जप्त केला. त्याचें पारिपत्य राजा धनी होऊन कां करीत नाहीं? यास्तव राजास दर्शन द्यावयाचें नाहीं." तदनंतर जगंनाथपंतीं विनंती केली जे, " तुळाजी आंग्रे याणें गांव जप्त केला तो राग स्वामीनीं राजेश्रीवर काढावा असें नाहीं. तुळाजी आंग्र्या प्रस्तुत धन्याशीं बदमस्त, महाराजांनीं ताकीदपत्रें दिलीं असतां मानीत नाहीं. त्या पक्षीं स्वामीनीं राजेश्रीवर राग करूं नये. दर्शन

देऊन समाधान करावें." तेव्हां सुप्रसन्न होऊन स्वामी बोलिले जे, "राजा आहे किंवा माघारा गेला ? असल्यास भेटीस घेऊन येणें." तेव्हां जगंनाथपंत बोलिले जे, "गांवाचे बाहेर गेले परंतु शोध करितां जवळ असल्यास घेऊन येतों. परंतु मी राजेश्रीकडे गेल्यानंतर पुन्हां स्वामी अदृश्य होऊन राजश्रीस दर्शन न दिल्यास मजकडे लटीवाद येईल. महाराजांचा शद्ब मजला लागेल. तेव्हां स्वामींनीं खातरजमेचें वचन दिलें ह्मणजे जातों." "शाहूस घेऊन येणें आम्ही कोठें जात नाहीं," असें स्वामीचें वचन घेऊन जगंनाथपंत राजेश्रीकडे गेले आणि वर्तमान सांगितलें कीं, स्वामींनीं आपणास दर्शनास बोलाविलें. तेव्हां महाराज परम समाधान पावोन श्रीस्वामींचे दर्शनास आले. श्रीवागजाईचे देवालया नजीक येऊन पालखींतून उतरोन चरणसंपुट काढून, अनवाणी बहुत अदबेनें हस्तयुगल जोडून जगंनाथपंत समागमें घेऊन श्रीस्वामींचे मठा सन्मुख आले स्वामींची व राजेश्रींची दृष्टादृष्ट होतांच स्वामी आसनावर उभे राहिले. हें राजश्रींनीं पाहून आपण मठा बाहेर उभे राहिले. तेव्हां स्वामींनीं राजश्रीस "मठांत या" ह्मणोन बोलिले त्याजवर महाराज स्वामींच्या आसना संनिध गेले. श्री स्वामी आसनावरून खालीं उतरून शाहूमहाराज यांस हातीं धरून आसनावर बसावयासि लागले. राजश्रीनें विनंती केली जे, "हे अमर्यादा मज पासून घडणार नाहीं. प्रथम मजला पाहून अभ्युत्थान दिलें याचें कारण काय व आसनावर बसा ह्मणतात याचें कारण काय हें मजला समजलें पाहिजे." तेव्हां स्वामी बोलिले जे "याचें कारण कांहीं असेंच आहे. तुह्मी स्वस्त बसावें ह्मणजे सांगतों." त्याजवर राजश्री स्वामीचें आसन सोडून पहिल्या चाली प्रमाणें भुमीवर बसोन मागती स्वामीस पृच्छा केली जे, "आज पर्यंत स्वामींनीं उथ्थापन मजला दिलें नाहीं आणि आज द्यावयाचें कारण काय ?" स्वामी बोलिले जे, याचें कारण आज पर्यंत आह्मी निस्पृह होतों आतां आह्मास कुटुंब लेकरें जाहलीं. तुमची स्त्री सगुणाबाई यांस आपली कन्या ऐसें ह्मणविलें तेव्हां तुह्मी आमचे जावई जाहालां तुमचा आदरमान अभ्युत्थान न करावें तरि आमचे लेकीस सासुरवास होईल. या कारणास्तव तुमचा सन्मान करणें प्राप्त आहे." राजे बोलिले जे, "बावा, आपण कसें ह्मणता ? परंतु प्राचीन आमची चाल आहे ती खरी" ऐसा क्षणेक उभय पक्षीं विनोद जाहलिया नंतर मागती राजश्रीनीं पृच्छा स्वामींस केली जे, "स्वामीचे दर्शनाची इच्छा धरून दर्शनास आलों तों स्वामी अदृश्य होऊन दर्शन न दिलें याचें कारण काय ?" स्वामींनीं उत्तर दिलें जे "कोंकण प्रांताचे गांवचीं इनामपत्रें तूं करून दिलींस आणि तु-

ळाजी आंग्रया गांव चालवीत नाहीं. याचें पारपत्य करीत नाहींस तेव्हां तूं धनी कशाचा, तो चाकर कशाचा?" असें स्वामींचें वचन ऐकोन राजश्री बोलिले "बावा, आंगऱ्या चाकर आमचा परंतु शिष्या कोणाचा?" तेव्हां स्वामी बोलिले जे, "शिष्य मातला" राजे बोलिले "चाकरही मातला, येविशींचा राग स्वामींनीं चित्तांत न आणावा. पर्यायें करून त्याचें पारिपत्यही होईल. व स्वामींचे गांवही चालतील." ऐसें उभय पक्षीं संतोषाचें बोलणें जाहलियानंतर क्षणेकाळें श्री स्वामींनीं राजेश्रीस आज्ञा केली जे, "शाहू, तुजला दोन गोष्टी पुसावयाच्या आहेत." असें स्वामींचें वचन ऐकोन राजश्री क्षणेक स्तब्ध राहिले. तेव्हां स्वामी बोलिले जे, "शाहू, उगाच कां राहिलास? तुजपाशीं कांहीं गांव दौलत मागत नाहीं. श्रीकृपेकरून सर्व अनकूल आहे. पुढील कांहीं दोन गोष्टी तुजला विचारतों त्यास उत्तर सांग." तेव्हां महाराज बोलिले जे, "आज्ञा करावी." उपरांत स्वामी बोलिले जे, "मजमागें माझे संस्थानास धनी कोण?" तेव्हां राजश्री बोलिले जे, "आज हे गोष्ट पुसावयाचें कारण काय?" स्वामी बोलिले जे, "मोठे मोठे पूर्वी अवतार व पांडवादिक राजे जहाले ते कोठें आहेत? आमची तों मानवी [काया] शरीर क्षणभंगुर. यास्तव पुसावयाचें कारण." येणें प्रमाणें स्वामींचें वचन श्रवण करून शाहू महाराज बोलिले, "स्वामींचे मागें संस्थानचा धनी मी" ह्मणोन आपले हृदयावर हस्त ठेविला. तत्समयीं श्री स्वामी बहुत संतोष पावोन जगंनाथपंत जवळ होते त्यांचा हात स्वामींनीं धरून महाराजांचे हातीं दिला. आणि सांगितलें जे, "आज पर्यंत चिमणाजी पंतापासून पुत्रवत् याचें पालन केलें. आतां धनी तूं. मजपेक्षां विशेष याचें चालवावें." ह्मणोन स्वामी बोलिले. महाराजानीं उत्तर केलें, "माझा जीव आहे तों पर्यंत अंतर करणार नाहीं. पुढील प्रकार स्वामींस विदित आहे." जगंनाथपंतास स्वामींनीं आज्ञा केली जे, "आज पर्यंत तुमचें मी पालन केलें. या उपरि धनी तुमचा शाहू. बरें वाईट पुसणें ते यांस पुसत जावें. एक निष्ठेनें तुह्मीं माझी सेवा केली तिचा उतराई मी आज जाहलों." असें बोलोन जगंनाथपंताचा हात महाराजांचे हातीं दिला. उपरांत स्वामी महाराजांस बोलिले जे, "एक गोष्ट जहाली. दुसरी एक गोष्ट विचारावयाची." राजे बोलिले, "आज्ञा करावी." तेव्हा श्रीस्वामी बोलिले, "माझें देहावसान जाहलिया नंतर माझें कलेवर कोठें ठेविसील?" तेव्हां महाराज बोलिले, "हे गोष्ट स्वामींनीं विचारूं नये, आह्मी सांगो नये, याचें कारण आज नाहीं." स्वामी बोलिले, "क्षण-वि-

ध्वंसिनी काया, या उपरि तुझें आमचें बोलणें होणें इश्वरी इच्छा." तेव्हां महाराज बोलिले "स्वामींचा हेतु कोणे स्थलीं आहे?" स्वामी बोलिले जे, "माळशिरसगांव तूं श्रीस दिला आहे. तेथें श्री भुलेश्वर देव. जागा फार रमणीक चांगली आहे. तुझे विचारास आल्यास समाधीचें स्थान ही मीं बांधून ठेविलें आहे." असें स्वामींचें वाक्य ऐकोन महाराज बोलिले "स्वामी अशी गोष्ट आधीं होणार नाहीं. जाहली तरि धावडशींत या मठांत या जाग्यावर स्वामींस ठेवीन." असें महाराज बोलतांच श्रीस्वामींनीं उत्तर केलें जें, "उत्तम आहे. श्रीजमार्गें संस्थानाचा धनी तूं. तुझे विचारास येईल त्या प्रमाणें करावें." या प्रमाणें स्वामींचें व महाराजाचें बोलणें बहुत संतोषयुक्त जाहलें. त्या उपरि महाराजांस श्रीस्वामी बोलिले जे, "शाहू, तूं आज फार श्रमी जाहलास. तुजला शिकार आज सांपडली नाहीं. तरि श्री तुजला शिकार येथेंच देईल. आधीं भोजन करावें." जगंनाथपंतास आज्ञा केली जे, "शाहूस वाड्यांत नेऊन भोजन घालावें."

या उपरि महाराज वाड्यांत येऊन भोजनास बसले तों अकस्मात् श्रीस्वामींचे मठा नजीक तळ्यांत अरण्यांतून मोठा सांबर येऊन उडी घातली. हें स्वामींनीं पाहून महाराज राजे यांस सांगोन पाठविलें जे, "तुजला देवानें शिकार येथेंच दिली. सत्वर येणें." ऐसा स्वामींचा निरोप येतांच भोजन पात्र तसेंच टाकून श्रींचे मठा नजीक तळ्यावर आले, तों सांबर तळ्यांत पोहत आहे. असें महाराजानीं पाहून मोठा चमत्कार मानून तळ्या भोंवतीं चौकीदार उभे करून आज्ञा केली जे, "स्वामींनीं शिकार दिली आहे हा सांवर कोणी मारूं नये, हत्यार चालवूं नये." ऐसी आज्ञा होतांच लोकांनीं उड्या घालोन सांबर जिवंत धरून बाहेर काढिला. महाराजा समीप येऊन गांवांतील बाजलीं आणोन त्याजवर सांबर घालोन देऊळे पागोटीं याणीं बांधून ठेविला. चराटांनीं बांधिल्यास नेते समयीं सांबराची त्वचा घांसेल, श्रमी होईल. या अर्थी पागोटीं याणीं बांधिला. या उपरि श्री स्वामी समीप महाराज येऊन बहुत चमत्कार वर्णून साताऱियास जाण्याची आज्ञा मागितली. श्री स्वामींनीं जगंनाथ पंतास आज्ञा केली कीं, "राजे यांस प्रसादवस्त्रें द्यावयाचीं घेऊन येणें." आज्ञे प्रमाणें वस्त्रें जगंनाथपंतीं आणिलीं. आणि स्वामींचे पुढें ठेविलीं. स्वामींनीं पागोटें बऱ्हाणपुरी लहरीदारे[६९] हिरवें याचा पदर हातीं घेऊन महाराजांचे हातीं दिला. राजेश्रींनीं पदर घेऊन दोन तीन वेढे मस्तकीं बांधिले. नंतर महाराज चित्तांत परम साशंक होऊन डोईचें

---

६९ लहरीदार=छानदार, झगझगीत.

तिवट तसेंच काढून ठेविलें आणि स्वामींस बोलिले जे "मजपासून मोठी चूक जाहली." स्वामी बोलिले जे, काय चूक जाहली ? राजे बोलिले जे, पूर्वी सांप्रदाय आमचा ऐसा आहे जे आधीं स्वामींचें आंग पुसावयाचें आंगवस्त्र मागोन घ्यावयाचें, उपरांत प्रासादिक वस्त्र आधीं स्वामींनीं आपले मस्तकीं बांधून आमचे मस्तकीं घालावें. ऐसा आज पर्यंत सांप्रदाय चालला. त्यास अंतर पडलें." असें ह्मणोन महाराजांनीं जगंनाथपंतास सांगितलें, दुसरें तिवट घेऊन येणें. दुसरें तिवट पोशाखी समीप नव्हतें यामुळें जगंनाथपंत उगेच राहिले. महाराजांनीं अर्थ समजोन सांगितलें जें, "जसें तिवट असेल तसें तीरूपयाचे किमतीचें घेऊन येणें. आह्मांस स्वामींचा प्रसाद घेणें, किंमतीवर नजर नाहीं." तेव्हां जगंनाथपंतीं स्वामींची आज्ञा घेऊन दुसरें तिवट आणिलें. महाराजांनीं अगोदर श्रीचें आंगवस्त्र मागोन घेऊन तिवटाचा पदर स्वामींचे हातीं दिला. स्वामींनीं आपले मस्तकीं बांधून राजेश्रीचे मस्तकीं घातलें. महाराजांनीं स्वामीस वंदन करून आज्ञा घेऊन समागमें सांबर घेऊन सातारियास गेले. पहिल्यानें ब्रह्मणपुरी पागोटें बांधलें होतें तें ही स्वामी जवळ मागितलें जे, हें ही प्रसादिक धणीस चोळ्यां करितां द्यावें. तें ही घेऊन सातारि यास गेले. आधीं धाकटी धणीन सौभाग्यवती सगुणाबाई यांचे वाड्यांत महाराज जाऊन शिकार सांबर स्वामींनीं दिला तो दाखविला. व स्वामींचें आपलें भाषण जाहलें तितकें धणीस सविस्तर सांगितलें. स्वामींची तब्येत फिरली ह्मणोन धनीस सांगितलें. त्यावरून सौभाग्यवती सगुणाबाई फारच श्रमी होऊन महाजारांस विनंती केली जे, "मजला आज्ञा होईल तरि स्वामींचे दर्शनास धावडशीस जाऊन येईन." महाराजांनीं आज्ञा केली जे, "महिना पंधरा दिवशीं जावें. आजच जावें असें कारण नाहीं." या उपरि फाल्गुन मासीं सन खमस अर्बैनांत धाकटी धनीण सौभाग्यवती सगुणाबाई श्रीचे दर्शनास धावडशीस आली. त्यांजलाही स्वामींनीं पुढें संस्थान चालावें ये विषयीं निवेणूक करून जगन्नाथपंत हातीं दिले. तदनंतर बाईस प्रसाद वस्त्र देऊन निरोप दिला. त्याजवर आषाढमासीं सौभाग्यवती सगुणाबाईसाहेब यांणीं यमाजी शिवदेव प्रतिनिधीचे मुतालीक यांस बोलावून आज्ञा केली जे, "यंदा श्रीस्वामींचें शरीर बहुत क्षीण जाहलें आहे. भाषणही उदासीनतेचें दिसतें. श्रावणमास जवळ आला. कृष्णातिरीं जाऊन समाधीस बसावयाचें स्वामींचें वार्षिक आहे. त्यास तुह्मी धावडशीस जाऊन माझी विनंती सांगावी जे, यंदा समाधीस बसणें तें धाव-

---

७० तिवट = पागोटें.

दर्शींतच बसावें. जें साहित्य लागेल तें पाठवून देऊं. **कृष्णातीरीं** थंडीवारा फार, तेथें न जावें. असें सांगोन स्वामी **कृष्णातीरीं** न जात असें करून येणें" ह्मणोन सांगीतलें. त्यावरून **यमाजीपंत धावडशीस श्रीचे** दर्शनास आले. तों दोन प्रहर जाहले. स्वामी स्नान संध्या जप समाप्त करून तळ्या वरील मठांतून वाड्यांत येते समयीं पिंपळाचे पारानजीक स्वामींची गांठ पडली. **यमाजीपंतीं श्रीस** वंदन करून धणीची विनंती सविस्तर निवेदन करीत वाड्यांत आले. स्वामींनीं सविस्तर बाईची विनंती **यमाजी**पंताचे मुखें श्रवण करून, "फार उत्तम आहे, बाईचें वचनापेक्षां मजला अधिकोत्तर नाहीं. बाईचे मनोदयानुरूप समाध येथेंच होईल. **कृष्णातीरास** जात नाहीं. बाईस सांगावें," असें **यमाजी**पंतास सांगोन निरोप दिला. आणि **जगंनाथ**पंतास बोलावून आज्ञा केली जे "**कृष्णातीरास** आतांच जाण्याचें. दोन घोडीं सत्वर तयार करणें. तुह्मीं समागमें चालणें." तेव्हां **जगंनाथ**पंतीं विनंती केली जे, "**कृष्णा**तीरीं समाधीस जाण्यासि चहूं दिवसांचा अवकाश आहे. आजच कशास जावें?" स्वामी बोलिले जे, **सगुणाबाई**चा आग्रह **कृष्णातीरीं** न जावें. आज **यमाजीपंतास** बाईनें पाठविलें, उद्यां खासा बाईच येतील तेव्हां मजला भीड मोडवणार नाहीं. राहावें लागेल. ऐशास स्वर्गीं मजला राजा, राणी कोणी उपयोगीं पडावयाचे नाहीं. तुमचें सर्वांचें पालण मीं केलें तुह्मींही कोणी स्वर्गीं माझे उपयोगीं पडावयाचे नाहीं. असें असतां मी आपलें व्रत अनुष्ठान टाकून, **कृष्णातीर** सोडून, येथें रहावें ठीक नाहीं" असें बोलून घरांत जाऊन **जगंनाथपंताची** मातोश्री **गोपिकाबाई** यांस बोलावून सांगितलें जे, "वाटीभर ताक प्राशनास घेऊन येणें." तेव्हां **गोपिकाबाईनें** वाटीभर ताक आणून दिलें. तें प्राशन करून बोलिले जे, "बाई, हेच शेवटींची ताकाची वाटी तुझे हातची" असें बोलून परसदारीं तुळसी वृंदावना समीप येऊन, तुळशीस प्रदक्षणा करून, मागती पुढील चौकांतून दरवाज्या बाहेर येऊन **बापूजीपंत, धोंडोपंत** सर्व मंडळी लहान थोर बोलावून बोलिले जे, "आह्मी **कृष्णातीरीं** समाधीस जातों. अतःपर तुमची आमची भेट हेच. तुह्मीं सर्वांनीं सुखी असावें."

ऐसा आशीर्वाद देऊन आपण घोड्यावर बसल. **जगंनाथपंतास** आज्ञा केली, "तूं घोड्यावर बसणें." उभयतां बोलत बोलत मौजे **अनेवाडी** येथें मार्गानें आंब्याची झाडें स्वामींनीं लाविलीं होतीं तेथें क्षणैक उभे राहून **जगंनाथपंतास** बोलिले, "आंब्याचीं झाडें फार चांगलीं जाहलीं." **जगंनाथपंतीं** उत्तर केलें, "लावणीचे समयीं एक गोष्ट गेली." स्वामींनीं विचारलें,

"कोणती गोष्ट गेली!" **जगंनाथपंत** बोलिले, रानोमाळ मार्गानें आंब्याचीं झाडें स्वामींनीं लाविलीं हीं एक जागां एक बाग करून लाविलीं ह्मणजे रखवालीचे वगैरेस फार उपयोगीं पडतें." स्वामींनीं उतर केलें" हें समजोनच आह्मी व्यवस्थावस्त [ ? ] मार्गानें लावणी केली. एक जागां बाग लाविला तरि तो बाग कोणी हकीम होईल त्याचा. तो रखवाली करील. तेव्हां गरीब गुरीब पांथिक यांस फळ कोठून प्राप्त होणार ? हकीम होईल तो बाग राखून आंबे उतरून गांवचे कुणब्याचे डोईवर देऊन आपले घरास नेईल. तेव्हां कुणबी माझे नांवें श्रमी होतील. हें कारण समजोन रानोमाळ झाडें लाविलीं आहेत. हकीम कोठवर रखवाली करील?" असें स्वामींनीं उत्तर केलें. आणि पुढील बंदोबस्ताच्या गोष्टी सांगत सांगत **कृष्णातीरास** आले. तेथें मठाजवळ घोड्यावरून **कृष्णातीरीं** उतरून हातपाय प्रक्षालन करून, **जगंनाथपंताचे** तीर्थरूप **चिमणाजी कृष्ण** यांचें थडें वृंदावन **कृष्णातीरीं श्रीस्वामींनीं** बांधलें तेथें स्वामी येऊन,वृंदावनास मस्तक ठेऊन,बहुत श्रमी होऊन,नेत्रांस अश्रुपात आणिले. तेव्हांजगंनाथपंतीं पुसिलें"स्वामींनीं ही गोष्ट अवलंबिल्यास आमची गत? आह्मांस त्राता कोण? तेव्हां स्वामींनीं उत्तर केलें,"मी होतों ह्मणोन **चिमणाजीपंतदादांचें** सार्थक मीं केलें. उद्यां माझें कोण करील?" असें श्रमें करून भाषण केलें. तेणेंकरून **जगंनाथपंतास** ही बहुत श्रम प्राप्त जाहले. मागती स्वामींनीं विवेक करून **जगंनाथपंताचें** समाधान केलें. आणि मठामध्यें येऊन बसले. तों **वीरमाडेकर** पाटील यांणीं दोन कांकड्या आणोन स्वामींचे पुढें ठेविल्या. तदनंतर स्वामींनीं **जगंनाथपंतास** आज्ञा केली जे, "सायंकाळ जाहला. तूं गांवीं निद्रेस जाणें. प्रातःकाळीं उठून येणें." त्यावरून **जगंनाथपंत वीरमाडे** येथें वस्तीस गेले. **श्रीस्वामी** मठामध्येंच **कृष्णातीरीं** राहिले. प्रातःकाळीं **जगंनाथपंत कृष्णातीरीं** मठा जवळ आले तों स्वामी स्नान करून जप करीत बसले होते. **जगंनाथपंतास** पाहून समीप बोलावून आज्ञा केली जे, " सत्वर स्नान करून ह्या दोन्ही कांकड्या घेऊन **सातारियास** जाणें. आणि एक कांकडी शाहुराजे यांस देणें व एक सौभाग्यवती **सगुणाबाईस** देणें, आणि आमचा निरोप सांगणे जे, बावा **कृष्णातीरीं** समाधीस गेले, तुह्मांस हे कांकडी प्रसाद दिली आहे. आणि सांगितलें जे, वांचलों तर तुमची आमची भेट **भाद्रपद** शुद्ध चतुर्थीस होईल. नाहीं तरि तुमची आमची हेच भेट." याप्रमाणें उभयतांस कांकड्या देऊन

---

७१ व्यवस्थावस्त ? व्यवस्था पूर्वक? व्यवस्थे रहित?

७२. हकीम = स्वामी, मालक.

निरोप सांगणें ह्मणोन आज्ञा जाहली. तेणें प्रमाणें **जगंनाथपंतीं** दोन्हीं कांकड्या घेऊन सातारियास धाकटी धणी **सगुणाबाई** यांजकडे गेले. तों तेच दिवशीं **महाराजांनीं** प्रातःकाळीं **सगुणाबाई** यांसि आज्ञा केली जे, "आज तुह्मी आपले स्वहस्तें रसोई[७३] सिद्ध करावी आह्मी **कोडोलीचे** रानांत शिँकार खेळून सत्वर भोजनास येतों." असें सांगोन **महाराज** शिकारीस गेले बाईसाहेबीं रुप्याच्या शेगड्या मांडून त्याजवर खासा स्वयंपाक स्वहस्तें करीत होतीं, तों **जगंनाथपंत** दर्शनास गेले. त्यास पाहून धनीण बोलिली जे, "दादा तुह्मी ह्मणत होतां जे बावा स्वामी **कृष्णातीरीं** समाधीस जातील, **धावडशीस** राहाणार नाहींत, त्यास काल आह्मी **यमाजीपंतास** श्रीस्वामींकडे पाठवून यंदा **कृष्णातीरीं** समाधीस न जावें, **धावडशीस** राहावें, असें सांगोन स्वामीस रहाविलें कीं नाहीं?" तेव्हां **जगंनाथपंतीं** विनंती केली जे, "आपण **यमाजीपंत** अंणास स्वामींकडे पाठविलें, त्यास **यमाजीपंता** जवळ **कृष्णातीरीं** जात नाहीं ह्मणोन स्वामींनीं आपणास सांगोन पाठविलें, **यमाजीपंत** अंणा निरोप घेऊन गेल्यानंतर तेच दिवशीं स्वामी निघोन **कृष्णातीरीं** मठास गेले. आपणांस एक व महाराजांस एक [अशा] दोन कांकड्या प्रसाद दिला आहे. आणि आपणांस निरोप सांगितला आहे जे, वांचलों तर **गणेचतुर्थीस** तुह्मची आमची भेट होईल, नाहीं तर हेच भेट." असा निरोप स्वामींचा **जगंनाथपंतीं** सांगोन प्रसाद कांकडी बाईचे पुढें ठेविली. स्वामींचा निरोप श्रवण करितांच बाई बहुत खेदातुर होऊन स्वयंपाकाचें संधान सोडून परम श्रमी होऊन बसली. **जगंनाथपंतास** बोलिली, "मजला बातमी कां नाहीं पोंचविली?" त्यास मशार निल्हेनीं विनंती केली जे "आपणास बातमी कळेल, आपली स्वारी येऊन **कृष्णातीरींचे** जाण्यास अडथळा होईल, हें स्वामींनीं चित्तांत आणोन त्वरा करून **यमाजीपंतास** निरोप देऊन तेच क्षणीं निघोन **कृष्णातीरास** गेले. बातमी पोहोंचवावयासि आवकाश पुरला नाहीं." असें **जगंनाथपंताचें** व बाईचें बोलणें होत आहे तों तेच क्षणीं महाराज शिकार खेळून भोजना करितां धाकटे धणीचे वाड्यांत आले. तों धणीन बहुत श्रमी होऊन, रसोई टाकून, म्लान वदन होऊन एकीकडे बसली. ऐशातें पाहून **महाराज** धणीचे समीप येऊन बोलिले जे, "रसोई सिद्ध जाहली कीं नाहीं?" बाईनीं उत्तर केलें जे, "आपणास रसोईची चिंता, मजला माझे बापाची चिंता प्राप्त जाहली." असें धणीचें वचन ऐकोन **महाराज** यांणीं

---

७३ रसोई = स्वयंपाक. "रसोयी स्यात्तु सिद्धान्नं" राजव्यवहारकोश.

७४. शाहूस शिकारीचा षोक फार होता

**जगंनाथपंत** समीप पाहून बोलिले जे, "तुह्मी धणीस काय वर्तमान येऊन सांगितलें? श्रीस्वामी स्वस्तिक्षेम आहेत कीं?" असें **जगंनाथपंतास महाराजांनीं** विचारिलें. **जगंनाथपंतीं**, "स्वामी क्षेमरूप आहेत, काल **कृष्णातीरीं** समाधीस गेले, आपणास कांकडी प्रसाद दिला आहे, आणि निरोप सांगितला आहे जे वांचलों तरि तुमची आमची भेट," ह्मणोन स्वामींचा निरोप सांगोन कांकडी पुढें ठेविली. **महाराजानीं** निरोप ऐकोन, साशंक क्षणैक होऊन बोलिले, "आह्मी दर्शनास गेलों ते समयीं आह्मांजवळ हेंच भाषण आणि हल्लीं तुह्मांसमागमें निरोपही याच प्रकारचा. महापुरुष, तपस्वी थोर, त्यांची लीला तेच जाणत. भगवत् इच्छा प्रमाण," ह्मणोन धणीस राजे बोलिले जे, "तुह्मी श्रमी किमर्थ? महापुरुष, तपस्वी कोणाचे स्वाधीन नाहींत. त्यांचें वार्षिक अनुष्ठानास आपणही व्याक्षेप करूं नये. त्यांचा ज्या गोष्टीनें संतोष तेंच करावें. ऋणानुबंध आहे तरि तुह्मी आह्मी **गणेश**चतुर्थीस **कृष्णातीरीं** जाऊन समारंभें करून स्वामीस **धावडशीस** घेऊन येऊं. ऋणानुबंध भेटीचा नसल्यास कोणाचाही उपाय नाहीं. येविशीं तुह्मीं तिलमात्र श्रमी होऊं नये." असें **महाराजांहीं** सांगितल्यानंतर बाईनीं विनंती केली जे, "आज्ञा जाहलियासि मी स्वामींचे दर्शनास **कृष्णातीरीं** जाईन." **महाराज** बोलिले जे," या समयीं स्वामी आपले समाधीचे अनुष्ठानांत, तुह्मी गेल्यास अनुष्ठानास व्याक्षेप होऊन महापुरुषाचा क्षोभ होईल. असें करूं नये. समाधी विसर्जन जाहलियानंतर तुह्मी आह्मी समारंभें दर्शनास जाऊं." या प्रकारें राजश्रींनीं धणींचें समाधान करून, **जगंनाथ**पंतास सांगितलें जे, "जे स्वामींची तव्यत एक प्रकारची भासते. तुह्मी वरचेवर बातमी पोचवीत जाणे." असें सांगोन निरोप दिल्हा.

इकडे **कृष्णातीरीं श्रावण** शुद्ध प्रतिपदेस वार्षिकी प्रमाणें गुहेंत जाऊन [स्वामी] समाधीस बसले. बाहेरून कवाड चिणून टाकिलें. दोन माणसें मात्र बाहेर चौकीस रखवालीस ठेविलीं. **जगंनाथपंत धावडशीस** आले, तदनंतर समाधी मध्यें आठ दिवस पूर्ण गेले. नवमीचे दिवशीं मध्यरात्रीं चौकीचीं माणसें बाहेर होतीं त्यांस आंतून स्वामींनीं हांक मारून, जवळ बोलावून आज्ञा केली जे "कवाड मोकळें कर." तेव्हां चौकीचे मनुष्यांनीं विनंती केली जे, "स्वामींचा नियम वार्षिक एकविसावे दिवशीं कवाड मुक्त करून बाहेर यावें, त्यास आज नऊ दिवस जाहले आहेत. पुढें काय आज्ञा?" स्वामी बोलिले "तुजला माझी आज्ञा प्रमाण, कवाड उघड." येविशीं निक्षून आज्ञा जाहली. तेंव्हां मनुष्यांनीं कवाड मुक्त केलें. स्वामी गुंफेंतून बाहेर आले, आणि

मनुष्यास बोलिले, "येथें हत्ती घोडे पालख्या ब्राह्मण बहुत दाटी दिसते. राजा आला आहे किंवा **पेशवे** कोण आले आहेत? दाटी कां केली ?" असें ह्मणोन चौकीचे माणसांस विचारलें. मनुष्यानीं उतर केलें, "आह्मांस कोणी दिसत नाहीं. आह्मी दोघे व स्वामी तिसरे; चौथें मनुष्य वगैरे कोणी येथें नाहीं." इतकें भाषण जाहल्या नंतर स्वामींनीं आपले दर्भासन गुंफेतून बाहेर आणून बाहेर बसावयाचें छपर होतें तेथें आसन आणून घातलें आणि आपण **कृष्णेंत** जाऊन स्नानें करून आसनावर येऊन बसोन चार घटका ईश्वराचें स्मरण प्रातःस्मरामि करून मागतो **कृष्णास्नान** केलें. शुक्रोदय होय तों पर्यंत चार स्नानें **कृष्णेचीं** केलीं. उपरांत आसनावर बसोन चौकीचे एक माणसास बोलावून सांगितलें जे, "स्वामींचे पोटांत किंचित् कळ निघाली आहे तरि मात्रा हेमगर्भाची व मध असें घेऊन सत्वर येणें, ह्मणोन **नानास** निरोप सांगोन लौकर घेऊन येणें," असें सांगोन एक मनुष्य **धावडशीस जगंनाथ पंताकडे** रवाना केला आणि आपण दर्भासन मृगासन लांब पसरून एक शालेचे पदरीं जपाची माळ बांधोन उशाकडे घेतली. दुसरी शालजोडी पांघरून घेऊन आसनावर नामस्मरण करीत करीत निद्रा केली. मुखें करून **राम राम** ह्मणतच होते. **धावडशीस** गडी रवाना केला तों पाहाटेचे दोन घटका रात्रीस आला. **जगंनाथपंतास** वर्तमान सांगतांच मात्रा मध घेऊन घोड्यावरून परमत्वरेनें अरुणोदयीं **कृष्णातीरीं** स्वामींचे मठा जवळ आले. तों स्वामी नामस्मरण करीत होते. चौकीदारास विचारिलें त्याणें सांगितलें, "अर्धघटिका नामस्मरण राहिलें. चार प्रहर निद्रा नाहीं, जागरण जाहलें, यामुळें आतां निद्रा लागली असें दिसतें" तेव्हां **जगंनाथपंत** जवळ बसोन सूर्योदय पर्यंत वाट पाहिली तरी जागृत न होत तेव्हां मुखावरील **शालचा** पदर काढून पाहिलें तों श्वासोश्वास नाहीं ब्रह्मीभूत जाहले. असें पाहून आश्रितजनांस कवळ प्रलयकाल प्रवर्तला. **धावडशी** व **विरमाडें** व **आनेवाडी** तीहीं गांवचे मनुष्य मात्र मठा जवळ मिळाले व अवांतर भोंवारगांव मिळोन उपरांत **जगंनाथपंत** व सर्व मंडळी एकत्र मिळोन विचार केला जे, स्वामींचें जाहलें वर्तमान सातान्यास **शाहुमहाराज** व धणीण यांस श्रुत करावें. त्यांचे विचारें पुढील कर्तव्यार्थ करावा. असें ठरावून **खंडोजी साळवी महाराजांकडे** सातारियास रवाना केला. तों **महाराज कोंडोलीचे** रानांत डुकराची शिकार खेळत होते तेथें सकाळचे बारा घटका दिवसास **खंडोजी** मजकूर **महाराजा** जवळ जाऊन मुजरा करून उभा राहिला. **महाराजांनीं** चेहरा पाहून चिन्ह ओळखिलें. पुसिलें जे, "स्वामींचें काय वर्तमान !" **खंडोजीनें** सांगितलें

शिव जाले. **महाराज** बोलिले "बोवा समाधीमध्यें होते, ब्रह्मांडीं आत्मा नेला असेल. असलें वर्तमान लटिकें जाहलियासि पारिपत्य करीन. खरें सांग." पुन्हां **खंडोजी** बोलिला जे, "मी आपले दृष्टीनें पाहून आलों. वर्तमान खरें आहे." तेव्हां **महाराजांनीं** शिकार मह्कूब करून बहुत खेद करून, आमचा सोबती गेला, असें वारंवार उच्चार करून संपूर्ण अष्टप्रधानांस ताकीद केली जे, सर्वांनीं **विरमाडें** येथें **कृष्णातीरीं** स्वामीचा काल जाहला तेथें आमचे समागमें चलावें. ऐशी राजआज्ञा होतांच **श्रीमंतराऊ प्रतिनिधी, नाना पेशवे, सचिव, मंत्री** आदिकरून अष्टप्रधान वगैरे मराठे सरदार **फत्तेसिंग भोसले, मोहिते, शिर्के, घाटगे, माहाडीक, निंबाळकर, पाटणकर, दाभाडे** सर्व सरदार सरंजाम सुद्धां महाराजांची स्वारी तयार जाहली. हें वर्तमान महालांत कळतांच उभयतां धणींनीं बहुत शोक आरंभिला. त्यांत धाकटी **सगुणाबाई** यांणीं फारच आक्रोश मांडिला. प्रत्यक्ष माता पिता यांचा शोक असा कोणी न करी ! हें वर्तमान महाराजांस कळतांच धाकटे धणीचे वाड्यांत येऊन बहुत प्रकारें शोकाचा परिहार केला. बाईचा आग्रह जे **कृष्णातीरीं** जाऊन स्वामींचे कलेवर दृष्टीनें अवलोकन करीन. **महाराज** बोलिले जे, आतां तुह्मी जावें हें ठीक नाहीं. त्यांचे सार्थक्याचा दिवस, तुह्मी तेथें गेल्यानें शोक मात्र करीत बसाल. स्वामींचे पदरींचीं मनुष्यें तींही शोक करतील. असें होईल. आम्ही गेल्यानें सर्वांचें शांतवन करून पुढील कर्तव्यार्थ यथास्थित संपादून येऊं. बारातेरा दिवस जाहल्यानंतर समाधीचे दर्शनास तुह्मीं जावें. आतां जाहल्या गोष्टीचा खेद तुह्मीं करूं नये." असें शांतवन करून, आपण अष्टप्रधान समागमें घेऊन, सैन्यासह वर्तमान **कृष्णातीरीं श्रीचे** मठाजवळ आले. **श्रीची** सर्व मंडळी खेदातुर पाहून सर्वांचें शांतवन करून, स्वामीचें कलेवर बाहेर आणून, कृष्णास्नान घालावें ह्मणोन महाराजांनीं सांगितलें. तेव्हां **जगंनाथपंत, शिवराम बापूजी, नारोराम, बाळकृष्ण अनंत** याचौघांनीं स्वामी दर्भासनावर होते तें दर्भासन चौघांनीं उचलून, **कृष्णेंत** नेऊन स्नान घालून बाहेर आणिले. महाराज समीप येऊन, आपले पालखींतील तक्यामागें टेऊन, कलेवर बसवून, आंगावर चादरें घालून बुका लावून षोडशोपचारें पूजा करून बोलिले, "आतां बावा आह्मासांगातें बोलतील कीं काय!" **जगंनाथपंतीं** उत्तर केलें "द्वैताचें ऐक्य जाहलें आतां कोणी कोणाशीं बोलावें!" याजवर **महाराज** सर्वांस बोलिले जे, "आतां स्वामींस समाध

---

७५ महाल = अंत:पुर, राणीवसा.

७६ चादर = आच्छादनार्थ पांढरें किंवा भगवें वस्त्र

कोठे द्यावी?" तेव्हां चौघे चौंप्रकारें बोलिले अन्यक्षेत्रीं प्राणियाचा काल जाहला तरी सुक्षेत्रीं **गंगातीरीं** नेऊन सार्थक करितात. हे गोष्ट अनायासें **कृष्णातीरीं** आपले समाधीमध्यें काल जाहला असें असतां येथून अन्यत्र स्थळीं नेऊं नये, येथेंच समाधी द्यावी. असें कित्येक बोलिले. कित्येक बोलिले, **माहुली** संगम महाक्षेत्र आहे तेथें व्हावी. सर्वांचे ऐकून **महाराजांनीं** उत्तर केलें, "तुह्मी ह्मणतां खरें परंतु **माहुलीमध्यें** दहा देवालयें दहा वृंदावनें थडगीं तेथें यांची समाध जाहलियासि पूजाउर्जा नैवेद्य नंदादीप महात्म कसें वाढतें? पातकी प्राणी आहे तो अन्यक्षेत्रीं जाहलियासि सुक्षेत्रीं नेऊन ठेविला. हे महापुरुष क्षेत्रास पावन करणार, जेथें राहतील तेथें तीर्थ क्षेत्र होईल असें आहे. आणि पूर्वी **धावडशीचे** मुक्कामीं येविशीं स्वामी जवळ आमचा करार आहे कीं **धावडशीमध्यें** या मठांत ठेवीन. त्या कराराप्रमाणें आज आह्मी **धावडशीस** नेऊन ठेऊं. उपरांत कोणाचे चित्तास नये तरि चितास येईल तेथें नेऊन ठेवावें. करारांत मी अंतर करणार नाहीं." असें बोलून कलेवर आपले खासे पालखींत घालून, आपण अश्वारूढ होऊन, अष्टप्रधान सहवर्तमान पालखी समागमें मोठे समारंभेनें **धावडशीस** घेऊन आले. तळ्यावर स्वामींचा स्नान संध्येचा मठ होता तेथें पालखी उतरून, स्वामींचें कलेवर बाहेर काढून, यतीचे समाधीचें पुस्तक **विनायक दीक्षित जोशी चिपळूणकर** यांणीं धरून **रावजी** बावा **उपाध्ये** महाराजांचे **पंडितराव** आंग * * * जाहले. प्रथम कलेवरास भागीरथीचे उदकें करून स्नान घालून पुढें जसे विधी पुस्तका प्रमाणें यथासांग **महाराजांनीं** केले. मठांमध्यें समाधीची गर्ता खणून तयार केली. उपरांत **महाराज** सर्व ब्राह्मणांस बोलिले कीं, "संपूर्ण विधी जाहला कीं कांहीं राहिला आहे?" सर्वांनीं उत्तर केलें जे, "सर्व विधी उरकला आतां समाधी मात्र द्यावी." त्या नंतर **महाराज** बोलिले "संन्याशी याचा मस्तकभेद शंखें करून करावा असें आमचें ऐकण्यांत आहे परंतु तुमचे पुस्तकांत आहे कीं काय?" तेव्हां **विनायक जोशी** आदिकरून समस्त ब्राह्मण बोलिले हा विधी पुस्तकांत आहे. असें ऐकून **महाराज** बोलिले जे, आह्मी स्मरण केलियावर तुह्मी पुस्तकांत आहे ह्मणून सांगतां, अगोदर विचारलें तेव्हां संपूर्ण विधी जाहला, कांहीं राहिलें नाहीं, असें बोलिलां याचा अर्थ काय? ब्राह्मणांनीं उत्तर केलें, "पुस्तकांत आहे परंतु दृष्ट पोचली नाहीं, यास्तव अगोदर सांगावयासी अंतरपडला." त्याजवर महाराज बोलिले शंखे करून भेद कोणीं करावा?" ब्राह्मणांनीं पुस्तक पाहून सांगितलें, पुत्रानें अथवा शिष्यानें करावा. तेव्हां **येसाजी भोसले** बोलिले स्वामींचा शिष्य मी आहें." **फत्तेसिंग**

**भोसले** हे "मी शिष्य आहें" असें बोलिले. तेव्हां **महाराजांनीं** उत्तर केलें "येथें पुत्र शिष्य [यांचे] सर्व अधिकार आमचे आहेत. मध्यें कोणी बोलूं नये. करितों तें पहावें. चुकेल तेथें सांगावे." असें **महाराज** बोलतांच सर्व शिष्य राहिले. **महाराजांनीं** शंख आणून आपले हस्तें मस्तकभेद केला. तदनंतर कलेवर उचलून गर्ते समीप नेले, **महाराज जगंनाथपंतास** बोलिले, "तुह्मां पासून एक गोष्ट पूर्वी गेली. देहावसान जाहलें ते समयीं कलेवराचें आसन घालून बसविलें असतें ह्मणजे समाधीस ठीक पडतें. आतां फार वेळ जाहला, असें करण्यासि पाय वळणार नाहींत परंतु घालून पहावें." तेव्हां पाय वळवून आसन घालून गर्तेमध्यें बसविलें. तेव्हां **महाराजांनीं** कल्पना[७७] काढून **जगंनाथपंतास** विचारिलें स्वामीचें आराध्य दैवत कोण?" उपासना कोणाची ? **जगंनाथपंत** बोलिले "**गणपतीची. महादेव**लिंग करून हस्तावर पूजा करावें. हा नित्य नेम स्वामींचा होता. " **महाराज** बोलिले त्यांतील पार्थिव **गणपती** असेल तरि आणावें. **जगंनाथपंतीं** उत्तर केलें "पूजाविसर्जन करून उदकांत टाकावे हा नित्यनेम." तेव्हां **महाराजांनीं जगंनाथपंतास** सांगितलें, तुमचे देवांतील तीन मूर्ती आणाव्या नर्मदे बाण व गणपती व एक शालिग्राम गणपती महादेव हे उ रा समवेत आणि सन्यांसीयासि मु खा सं व त विष्णु शालिग्राम एकूण तीन मूर्ती आणणें. त्या प्रमाणें तीन मूर्ती आणून स्वामींचे कलेवराचे हस्तांची अंजुली करून त्यांत तीन मूर्ती ठेऊन पूजा करून गर्ते मध्यें मीठ घालून गर्ता भरून काढिली. भूमीसमान करून त्याजवर विटांचा चौथारा बांधून त्याजवर जरीचा पदर घालून, षोडशोपचार पूजा **महाराजांनीं** स्वहस्तें करून, शत रुपये पुढें दक्षणा ठेविली, आणि सर्व अष्टप्रधान, बोलावून त्यां करवीं समाधी जवळ नजरा लावून[७८] सर्वांस स्वमुखें सांगितलें "**महाराज** गेले आणि स्वामी आहेत असें समजोन सर्वांनीं पूर्ववत् निष्ठा धरून चालावें. वर्षासनें पहिल्या प्रमाणें सर्वांनीं द्यावीं. त्यांत अंतर करील त्यास शपत असे. व शिवाय पारपत्य होईल." असें सर्वांस समक्ष ताकीद करून **श्रीचे** मंडळीच कारकून वगैरे सर्वांचें समाधान केलें. "**श्री स्वामी** आहेत असें चित्तांत आणून चिंता सोडून सुखरूप रहावें." असें सर्वांस सांगून **विष्णु विश्वनाथ** धाकटे धणीचे दिवाण यांस बोलावून सांगितले जे "**श्रीची** सर्व मनुष्यें भयाभीत जाहलीं आहेत त्यास सरकारचे शेपन्नास माणसें घेऊन तुह्मीं आज येथें राहून सर्वांचे समाधान करावें. रात्रीं चौकी पहारा

---

७७. 'असलकण्यासीपाय' असें मूळांत आहे.

७८. 'करवून' ( ? )

यथास्थित करावा. प्रातःकाळीं फिरोन आह्मीं येतों" असें विष्णुपंतास सांगून आपण निघोन सातारियास गेले. निघावयास चार सहा घटका रात्र जाहली. दुसरे दिवशीं प्रातःकाळचे प्रहर दिवसास सडे स्वारीनें महाराज धावडशीस आले. स्वामी वर्तमान असतां ज्या रीतीनें दर्शनास येत त्याच रीतीनें समाधीचें दर्शनास गेले. तों समाधी जवळ पायपोसाचे जोड्याचे पायाचा चिखल लागला होता. तेव्हां जगंनाथपंतास महाराजांनीं विचारलें, हें काय दिसतें ? जगंनाथपंतीं पाहून विनंती केली "कोणाचा जोड्याचा पाय लागला आहे." तेव्हां महाराज बोलिले, "काय लोक हराम चोर आहेत ! स्वामी असतां बहुत मर्यादा अदब वागवीत होते. आतां अमर्यादा वर्तणूक करितात हें ठीक नाहीं. सर्वांस निक्षूण ताकीद करणें" ह्मणून सांगितलें. "तेरावे दिवशीं ब्राह्मणभोजन भंडारा करावयाचा. सर्व साहित्य आह्मी सातान्याहून पाठवून [देऊं] जाग्याची वगैरे तरदूद ठीक करणें." असें सांगून महाराज सातारियास गेले. उपरांत धाकटी धणीन सगुणाबाईसाहेब यांणीं चार पांच हत्ती नीं रो ज ह मी [नेहमी?] सामान वाहावयालि लाविले. श्रावणमास, नदीस पाणी, बैलावरून सामान आलीकडे नये सबब हत्तीवरून सामान भोजनाचें व फरासखान्याचें पाठवून दिलें. पिंपळाचे पारा नजीक आंबराईंत डेरा उभा करून पाकशाला केली. कढी सांबारीं ओतावयासि मोठे-मोठे हौद चुनेगच्ची केले. श्री हणमंताचे देवालया पासून वागजाईचे देवळा पर्यंत मैदानीं बावरांत ब्राह्मणाचीं पात्रें मांडावयासि जागा करून श्रावण वद्य सप्तमीस तेरावे रोजीं सर्व ब्राह्मण भोजन करावें असा निश्चय करून, पष्ठीचे दिवशीं आचारी खटपटी दहीं दूध आदि करून शाकभाजी सर्व साहित्य सुद्धां विष्णु विश्वनाथ दिवाण यांस बाईसाहेबीं पाठविलें. रातोरात दहा सहस्त्रांचा स्वयंपाक तयार केला. सप्तमीचे दिवशीं प्रहर साहा घटका दिवस प्रातःकालचा आला तों महाराजांची स्वारी अष्टप्रधानासुद्धां आली. चार पांच हजार ब्राह्मण तेलंग सुद्धां जमा जाहले. महाराजांनीं समाधीची पूजा करून ब्राह्मणांचीं पात्रें मांडावयाची आज्ञा करून आपण समीप उभे राहून ब्राह्मणभोजन यथास्थित घातलें. महाराज उभे राहिले तेव्हां मोठमोठे मुत्-छदी सरदार कारकून साहित्यास लागून ब्राह्मण [भोजन] सांग संपादिलें. उपरांतिक महाराजांनीं जगंनाथपंतास सांगितलें "ब्राह्मणांस दक्षणा द्यावयाची ते

---

७९ वर्तमान = जीवंत.

८०. भंडारा = गोंसावी किंवा बैरागी यांची जेवणावळ.

८१ फरासखाना = बिछायतींचें सामान ठेविण्याचें स्थळ. अस्तरणागार, फरासखाना. भिधानकम्' रा० व्य० को०.

८२ बावर = शेत जमीन.

सातारागडावर सरकारची गोकुळअष्टमीची दक्षणा व ही एकत्र देऊं. येथें दिल्यास ब्राह्मण गवगवा करितील." असें सांगोन महाराज निघोन सातारियास गेले. दोनतीन सहस्राचें अन्न राहिलें तें शूद्र मंडळी महाराजांकडील व गांवगन्नाचे भोंवार गांवचे समारंभास मिळाले त्यांस भोजन घातलें. गोकुळअष्टमी जाहल्या नंतर महाराजांनीं येथील संतर्पणाचा व तेथील एकत्र देकार गडावर दिल्हा. तदनंतर महाराजांनीं विष्णु विश्वनाथ धाकटे धणीचे दिवाण यांस आज्ञा केली जे, जगंनाथ पंतास चिटी पाठविणें जे स्वामीचे कारकून मंडळी व गांवगन्नाचे पाटील लोक घेऊन येणें. ह्मणोन आज्ञा जाहली. आज्ञे प्रमाणें विष्णुपंतीं चिटी पाठविली. उपरांत सर्व मंडळी घेऊनं श्रावण वद्य दशमीस जगंनाथपंत महाराजांकडे गेले. महाराज कचेरीस होते. सरकार कारकून मंडळी भर कचेरी मध्यें जगंनाथपंतास समीप बोलावून महाराज बोलिले, "श्री स्वामींचा काळ जाहला अत:पर तुह्मांस धणी कोण?" जगंनाथ पंतीं विनंती केली "पूर्वींच स्वामींनीं महाराजांचें पदरीं [घातलें.] मायबाप धनी सर्व महाराजांचे पाय." असें ऐकून महाराज बोलिले महाराजांचे आज्ञे प्रमाणें वर्तणूक केल्यास संस्थान तुमचे स्वाधीन करिन." तेव्हां जगंनाथपंतीं उठोन महाराजांस मुजरा करून विनंती केली, "महाराजांची अवज्ञा घडणार नाहीं." तेव्हां महाराज बोलिले, तुह्मांस चार गोष्टी सांगतों ध्यानांत आणून उत्तर करणें ह्मणोन आज्ञा केली. आणि बोलिले जे, " जुनें मोडूं नये आणि नवें करूं नये." जगंनाथपंतीं मुजरा करून, आज्ञा ह्मणोन उभे राहिले. पुन्हा महाराज बोलिले, "स्वामी करीत होते तें करूं नये आणि स्वामी करीत होते तें मोडूं नये." असें बोलून नेच्या हातीं घेऊन हुक्का ओढावयासि लागले. क्षणेक जाहला. परंतु जगंनाथपंतीं उत्तर केलें नाहीं. असें जाणून महाराजांनीं हातींचा नेच्या टाकून बोलिले "तुह्मांस जाबसाल पुसिला त्याचें उत्तर कां करीत नाहीं?" जगंनाथपंतीं उत्तर केलें, "महाराज बोलिले तें समजलों, परंतु त्या भावें उमजलों नाहीं." महाराज बोलिले "त्याचा भाव उमजणें कठीण काय? या तुह्मांस समजोन सांगतों." असें बोलिले. जगंनाथपंतास जवळ बसवून बोलिले जे, "आह्मीं तुह्मांस सांगितले जे स्वामी करीत होते तें करूं नये. याचा भाव स्वामी सर्वांवर रागें भरीत होते, शिव्यागाळ देऊन हजारों रुपये मागत होते, घेत होते. हीं कामें तुह्मांस होणार नाहींत. तुह्मीं करूं नये. दुसरी गोष्ट स्वामी करीत होते तें टाकूं नये. याचा भाव इतकाच इमारतीचें काम स्वामींनीं आरंभ केला असेल ती शेवटास

८३ नेचा = हुक्याच्या नळीचें वेटोळें.

न्यावी व वार्षीक उत्साह देवाचे अभिषेक नैवेद्य नंदादीप पूर्ववत् चालवावे. संस्थानचे कारकून व दासदासी पाटील रयतेचे सर्वांचें स्वामी प्रमाणें चालवावें. पहिल्या प्रमाणें डौल चालवणें." या प्रमाणें महाराजांनीं सांगितल्यानंतर महाराजांची आज्ञा शिरसा वंद्य ह्मणोन जगंनाथपंतीं मुजरा केला. महाराजांनीं जवळ बसवून जामर्दारखान्यांतून वस्त्रें आणविलीं. महाराजांनीं स्वहस्तें आधीं जगंनाथपंतास मंदील बांधल्यानंतर बापूजीपंतास तिवटे ताडपत्री पासोडी दिली. त्याजवर धोंडो भास्कराचे चिरंजीव जगजीवनपंत यांस तिवट ताडपत्री पासोडी दिली. नारो राम यास दोन सनगें दिलीं. उपरांत सर्व कारकून राहिले त्यांस असामीस एक एक वस्त्र [या] प्रमाणें दिलें. त्याजवर महाराजांनीं संस्थानचे गांवचे पाटील सारे बोलावून स्वमुखें आज्ञा केली जे "ज्या प्रमाणें स्वामींच्या आज्ञेंत वर्तत होतां त्या प्रमाणें जगंनाथपंताजवळ वर्तावें व दिगर केलियास करणाराचें डोकें फोडीन." या प्रमाणें संस्थानचे गांवगन्नाचे पाटिलांस निक्षून ताकीद करून पाटिलांस द्यावयासि तिवटें आणवून जगंनाथ पंतास सांगितलें पाटिलांस वस्त्रें द्यावीं. तेव्हां वीरमाडकर केरोजी पाटील सोनवणे थोरले देवडीस[८७] चाकरीस होते त्यांस तिवटें आणवून दिलीं. पुढें महाराज बोलले धावडशीकर पाटील कोठें आहेत, त्यांस बोलावा. धावडशीकर पाटील यास आधीं वस्त्रें देऊन मग सर्व गांवचे पाटिलांस द्यावीं. त्या प्रमाणें धावडशीकर पाटिलास आधीं देऊन उपरांत सर्व पाटिलांस दिलीं. चाकर लोक सोमाजी, नारोजी, खंडोजी तिघांस तीन वस्त्रें देऊन सर्वांस सांगितलें, स्वामी जवळ वागत होतां त्या प्रमाणें जगंनाथ पंताजवळ वर्तणूक करावी. या प्रमाणें सर्वांस सांगून आज्ञा देऊन जगंनाथपंताचे समागमें सरकारचा कारकून देऊन प्रतिनिधी, पेशवे, सचिव, मंत्री सर्व अष्ट प्रधान यांजकडून वस्त्रें देवविलीं. थोरले धणीन सकारबाई यांणीं जगंनाथपंतास नेऊन बहुत प्रकारें समाधान करून वस्त्रें देऊन निरोप दिला.

त्याजवर दसरा दिपवाळी जालिया नंतर सौभाग्यवती सगुणा बाईसाहेब यांणीं जगंनाथपंतास बोलावून नेऊन सांगितलें जे, "स्वामींचे समाधीचें देवालय संगीन काम मातबर करावें. दौलताबाजी कागदा प्रमाणें दगड बारीक घडवावा. आणि येथून महालांतून देवळाचें शिखर दिसे इतकें उंच बांधावें. या कामास किती लागो, परंतु या प्रमाणें काम करावें." या प्रमाणें आज्ञा

---

८४. "जामदारखाना तु वसनागारं" रा० व्य० को०

८५. तिवट = पागोटें.

८६. दिगर = अंतर.

८७ थोरले देवडीस = वडील राणीकडे. मागें पृ० १८ ओ० १२ पहा.

झाली. विष्णुपंत दिवाणजी यांसि सांगितलें "तुह्मीं धावडशीस दादांचे समागमें जाऊन समाधीचे देवळाचा बेत करून देऊन येणें." सौभाग्यवती सगुणाबाई साहेब यांणीं जगंनाथपंत आपले बंधु असें मानून फारच लोभ ममता करावी. दादा ह्मणोन सल्ला घ्यावा. दिवाणजीस आज्ञा जाहलि-यावर दिवाणजी विष्णुपंत व जगंनाथपंत नाना असे सातारियाहून धावडशीस येऊन श्री स्वामींचे समाधीचे देवालयाचा बेत करून तळयावर ऌदाव[८८] करून देवळाचा मंडप पूर्वेकडे प्रशस्त करावा. देवालय मध्यें घेऊन चौफेर आवार धर्मशाळा कराव्या. या प्रमाणें दिवाणजींनीं बेत करून दिले. नगरकर संकाजी गौंडी व व्यंकाजी गौंडी कारागीर चांगला पूर्वी स्वामींजवळ भुलेश्वराचे[८९] कारखान्यावर होते त्यांस बोलावून आणिलें. सन सिंतं[९०] अर्बैना-मध्यें यासि सुमुहूर्तें पाया खणावयासि कारखाना लाविला. तळया बरोबर पाया खोल खणून तयार केला. वेदमुर्ती विनायक दीक्षित चिपळूणकर जोशी धावडशीस येऊन सुमुहूर्त पाहून देवालय मातबर बांधलें. संस्थान दि-वसेंदिवस अधिकोत्तर वाढवावें, वर्षामध्यें दोन चार वेळां आपण खासा धावडसी मध्यें येऊन परामृष करावा, महाराज छत्रपति येऊन सर्वदा सांभा-ळावें, इमारतीचे खर्चास जो रुपया लागेल तो बाईसाहेबांनीं पाठवीत जावा, या प्रमाणें सीत सबां व समान तीसों[९१] सालां चालिलें. सन तिसा अर्बैना मध्यें सौ-भाग्यवती सगुणाबाई यांस क्षयाची व्यथा जाहाली. जागांजागां देवस्थानीं अनुष्ठानें अभिषेक अर्घ्यप्रदानें नमस्कार घालावयासि ब्राह्मण लाविले. श्री स्वामीं-चे समाधी जवळ मेर्हलिंगीं[९२] ब्राह्मण अनुष्ठानास लाविले. महाराज छत्रपति यांणीं बहुत उपाय देव मानवी केले. परंतु व्यर्थ. सगुणाबाईस उतार न पडे. दि-वसें दिवस क्षीणता होत चालली. त्यामुळें महाराजांची मर्जी ठिकाणीं नाहीं. सर्व कारभार सोडून नेहमीं बाईचे पलंगा जवळ बसले. महाराजांचे आज्ञे शिवाय अष्ट प्रधानादि करून कोणाचें गमन धणीकडे नव्हतें. त्यामुळें दोन मास जगंनाथपंत सौभाग्यवती बाईसाहेबांकडे गेले नाहींत. तेव्हां बाईनीं स्म-रण करून धावडशीस हुजऱ्या पाठविला जे, श्री स्वामींचे समाधीचा आंगारा

---

८८ ऌदाव=भिंतींत आर, दुसऱ्या बांध कामांत कमान देणें असतां कमानीच्या पोकळींत (गाभ्यांत) जें मातीचें अगर लांक-डाचे काम करावें लागतें तें. कमानी?

८९ धावडून भुलेश्वराचें देऊळ स्वा-मींनीं बांधिलें असें होतें. होळकर सरकारानें थोडे दिवसां पूर्वी जी रक्कम दिली ती या देवाळयाच्याच जीर्णोद्धारा प्रित्यर्थ असें वाटतें.

९०. सन सीत अर्बैन=११४६ सन इ० १७४५.

९१. सीत, सबा, समान, तिसा ११४६ ४७-४८-४९.

९२ मेर्हलिंग (?)

तीर्थ घेऊन दादा तुह्मीं येणें. ह्मणोन जगंनाथपंतास बाईसाहेबांचा निरोप आला. त्यावरून श्रीचें तीर्थ आंगारा घेऊन सातारां धाकटे धणीचे वाड्यांत गेले. तों धणीचे खोलीचे बाहेर कवाडांत खासा महाराज बसले [आहेत]. आंत परवानगी शिवाय कोणाचें गमन नाहीं. असें पाहून चार घटका बाहेर देवडीवर बसले. तों महाराज तेथून उठोन क्षणैक बाहेर गेले तों आंतून बाईचे सेवेशीं परिचारिका बाहेर आली. तिणें जगंनाथपंतास पाहून तीर्थ आंगारा आणिला कीं काय ह्मणोन पुसोन धणीस जाऊन सांगितलें. त्याजवर बाईनीं फिरोन तिजला पाठविलें जे, दादास आंत घेऊन येणें. त्या प्रमाणें तीर्थ आंगारा घेऊन जगंनाथपंत धणीकडे कोठडींत गेले. बाईनें दृष्टीनें पाहून फार श्रमी होऊन बोलिली, दादा माझा परामर्ष वरा करितां! यांणीं विनंती केली "तीर्थ आंगारा घेऊन नित्य येईन. परंतु महाराजांची मर्जी एक प्रहर [?] आज्ञे शिवाय कोणी आपणाकडे येऊं नये असें सर्वांस ताकीद महाराजांची. तेथें उपाय माझा काय ?" बाई बोलिली, तुह्मांस परवानगी कशास पाहिजे ? आठाचौदिसां श्रींचें तीर्थ आंगारा आणीत जावा. असें बोलत आहे तों महाराज छत्रपति येऊन कवाडांत उभे राहून रागें भरून बोलिले जे "न पुसतां आंत कां गेलां? माझें घर कां बुडवितां ? " हीं वचनें बाईचे श्रवणीं पडतांच महाराजांस जवळ बोलवून फार श्रमी होऊन रोदन करूं लागली. महाराज बोलिले श्रमी कां होतां? काय कारण ? बाई बोलली मी वर्तमान असतां मज देखत यांस महाराज रागें भरतां, तेव्हां माझें मागें यांस सातारा परका होईल असें दिसतें. मी आहें ह्मणून बोलावीन आणि हेही येतात. मजमागें आपणही बोलाविणार नाहीं, तेही कशास येतील ? " असें फार श्रमें करून भाषण केलें. तेव्हां महाराज बोलिले, आह्मीं यांस ओळखिलें नाहीं. आणखी कोणी असेल ह्मणून रागें बोलिलों. तुह्मीं कांहीं श्रमी न व्हावें. जगंनाथपंतास बोलिले, तुह्मांस मनाई नाहीं. श्रीची प्रार्थना करून तीर्थ आंगारा दो तीं दिवसां आणीत जाणें. तेव्हां जगंनाथपंताचा हात धणीनें धरून महाराजांचे हातीं देऊन बोलिली, "यास श्री स्वामींनीं माझे हातीं दिलें आतां मी तुमचे हातीं दिला. यास माझें स्मरण न होय असें करावें. याचें चांगलें व्हावें. यासि अंतर जाहालियासि माझा हेत राहील." तेव्हां महाराज छत्रपति यांणीं बाईचे गळ्यावर हात ठेऊन बोलिले "तुमचे गळ्याची शपत यास अंतर होईल तर, माझा जीव आहे तों अधिकोत्तर चालविणेंविशीं तुह्मीं हेतु ठेऊं नये." असें महाराजांनीं धणीचें समाधान केलें. जगंनाथपंतास सांगितलें तुह्मीं कोणेविशीं चिंता न करणें. श्रीची प्रार्थना करून धणीस आरोग्यता सत्वर होय असें करावें, ह्मणोन सांगितलें. त्या-

जवर महाराजांची व धणीची आज्ञा घेऊन घरास धावडशीस आले. तदनंतर धणीची व्यथा दिवसें दिवस भारी होत चालली. शरीर फारच क्षीण पाहून धणीनें महाराज छत्रपति यांस विनंती केली जे, जेजुरी मध्यें जाऊन श्रीचें दर्शन करावें हा हेत आहे. याजवरून महाराजांनीं धणीस घेऊन जेजुरीस श्रावणमासीं गेले. श्रीचें दर्शन घेऊन आठचार मुक्काम तेथें केले. तों व्यथा भारी होऊन भाद्रपद शुद्धांत देवआज्ञा जाहली. अस्तमानीं देहावसान झालें. तेच क्षणीं पालखींत शव घालून महाराज सूर्योदयास महावली संगमीं येऊन बारा दिवस पर्यंत दान धर्म बहुत केला. अस्थि रक्षा घागरी भरून, धावडी करून श्रीवाराणशीस रवाना केल्या. उपरांत महाराजांची उदासीन वृत्ति जाहली. फिरोन सातारियास जाणें सोडून खेडांत, कांहीं दिवस कोंडोली, असें जागां जागां मुक्काम रहावें. एक पळ चित्त स्वस्थ नाहीं. उभयतां मध्यें अत्यंत प्रीति होती. तो वियोग जाहलिया नंतर सदैव मर्जी दिक्क[९३]. एके दिवशीं धावडशीस येऊन श्रीचे समाधीचें दर्शन करून देवालयाचें काम भारी पाहून जगंनाथपंतास बोलिले "ज्याचे भरंवशियावर तुह्मीं हें काम लाविलें ती गेली. आतां लगट करून मोठें थोटें काम करून आमचा जीव आहे तों शेवटास नेऊन निवारणें." असें सांगून महाराज गेले.

## समाप्त.

[ नंतर[९४] बोवांचे आज्ञे प्रमाणें जगंनाथ चिमणाजी कारभार करूं लागले. श्रावणमासीं नियमा प्रमाणें वीरमाडचे रानांत कृष्णातीरीं गुंफा

---

९३. दिक्क=नाखुष, खिन्न. सगुणाबाईच्या वियोगानें शाहू भ्रममिष्ट होऊन पुढें पुढें तर शुद्ध वेड्या सारखें वर्तन करूं लागला. एक दिवशीं भर दरबारांत त्यानें आपली पगडी आपल्या कुत्र्याच्या डोकीस घालून 'ह्याची आज्ञा मानीत जा' ह्मणून सर्व दरबारी लोकांस सांगितलें असें ह्मणतात.

९४. कोल्हापुराहून आह्मांस एक प्रत मिळाली ह्मणून मागें लिहिलें आहेच. तिची हकीगत अशी. ही विष्णुपंत भागवत विरमाडकर यांणीं पाठविली. ही शके १७६९।७० त लिहिली असावी. अक्षर सुरेख असून स्पष्ट आहे. जुन्नरी कागदाच्या उभे बंदावर लिहिली आहे. बंद २३ पाटपोट आहेत. ते बऱ्याच ठिकाणीं कसरीनें कुरतुडले आहेत तथापि अगदीं दुर्बोध अशीं स्थळें फार थोडीं आहेत. वर पृ० १९ ओळ २१ पर्यंत साताऱ्याहून आलेल्या प्रतीशीं ह्या कोल्हापूरच्या प्रतीचा मेळ बहुशः जमतो. परंतु पुढें स्वामींची हकीकत हींत संक्षेपतः असून संस्थानाच्या पुढील हकीगती बद्दल मजकूर बराच आहे. हा मजकूर साताऱ्याहून आलेल्या प्रतींत बिलकूल नाहीं. स्वामींच्या हकीगतींत भेद किती आहे व आपलीं संस्थानें भाऊबंदीच्या तंट्यामुळें कशीं नाशाप्रत पावतात हें समजावें ह्मणून पृ० १९ ओळ २१ याच्या पुढील जो मजकूर कोल्हापूर प्रतींत आहे तो, व मागील भागांत थोडे पाठभेद आहेत ते येथें देऊं, ह्मणजे हें प्रकरण संपलें.

बांधून स्वामींनीं असावें ते भाद्रपद शुद्ध ४ चतुर्थीस बाहेर निघावें असा क्रम चालला होता. त्या प्रमाणें शके १६६७ संवत्सरीं श्रावणमासीं नियमास आरंभ करून, दार चिणून, गुंफेंत गोमूत्र व मिरच्यांचा गोळा गवाक्ष वाटेनें ठेवावा, तो आंत घेऊन क्षुधा निवारण करावी, असें असतां शुद्ध ९ चे रोजीं गोमूत्र व गो... घेतला नाहीं. तसाच ठेविले जागीं राहिलियावर कवाड उघडोन आंत पहातात तों स्वामी समाधिस्त जाहले. नंतर हें वर्तमान धावडशीस नानांस कळलें. त्यांणीं सातारियास महाराजांस जाहीर केलियावर महाराज येऊन तें शव पालखींत घालून धावडशीस नेलियावर शंखभेद समाधी समयीं शिष्यानें अगर पुत्रानें करावा. शिष्य मंडळी फार यास्तव महाराजांनीं आपलें हातें शंखभेद करून समाध दिल्हियावर देवालयाचें काम सुरू केलें. सौभाग्यवती सगुणाबाई ह्मणोन महाराजांची राणी ती बावांस तीर्थरूप ह्मणत असे. ती दोन वर्षांनीं ह्मणजे शके १६६९ रांत समाप्त जाहली. तदनंतर शके १६७१ संवत्सरीं शाहूमहाराज निवर्तले. चार वर्षांत देवालय जितकें जाहलें तें जाहलें. उपरांत रामराव विष्णु दिवाण महाराजांकडील होते त्यांणीं कांहीं भरणा करून काम अटोपून घेतलें. व पेशवे कारकिर्दीत संस्थानचा बेहडाही करून घेतला. जगंनाथपंत यास पुत्र थोरले कृष्णाजीपंत, राघोपंत, बाबुराव, भास्करपंत, परशुरामपंत, असे पांच. शके सालीं जगंनाथपंत मृत्यु पावलियावर कृष्णाजी जगंनाथ याणीं सर्वांचे अनुमतें काम कारभार करूं लागले. कृष्णाजीपंता पाठीमागें राघो जगंनाथ याणीं कारभार केला. त्यांचे पुत्र बळवंतराव रघुनाथ यांणीं श्रीचे पुढें मंडप एकसालीं वतनें सर्वत्र मंडळीचीं घेऊन बांधिला. व रावजी आपाजी प्रभू कलभेकर यांसि गायकवाड यांची दिवाणगिरी जाहली. रावजीचा स्नेह सबब बळवंतराव रघुनाथ गुजराथींत जाऊन रावजीची मर्जी संपादून श्रीजवळ चौघडा असावा सबब मादें ह्मणून गांव इनाम करून घेऊन, चौघडा सुरू केला. व रावजींनीं बोरसद परगणा बळवंतराव यांजकडे सांगितला. रावजींचा काळ जाहलियावर कांहीं दिवशीं बळवंतरावही मृत्यु पावले. त्यांचे चिरंजीव गणपतराव निघोन धावडशीस आलियावर गणपतराव व जनार्दन रघुनाथ कारभार संस्थानचा पाहूं लागले. चौघड्याचा खर्च भागून बाकी ऐवज राहील ती शिलक गणपतराव माजी ह्मणों लागले. सबब चीड पडून भाऊपणांत अनेक खटलीं उभीं राहिलीं. सबब गोविंदराव दिवाण यांजकड संस्थानची जप्ती सात वर्षें करून कारकून गोविंद बल्लाळ व व्यंकाजी भोंसला आणोन काम ते पाहूं लागले. त्यावर

शिलकेविशीं भावांनीं बोलूं नये असें करोन जनार्दन रघुनाथ याणीं जप्ती मोकळी केली. पुढें गणपतराव व जनोबा मेलियावर धाकटे महाराजांचे काराकीर्दीस तांबे यांस गणपतराव यांचे चिरंजीव राघो गणेश व कृष्णाजी जगंनाथ यांचे नातु विष्णु गोपाळ या उभयतांनीं खटला उत्पन्न करून जाब सव्वाल सातारियांत पडों लागले. त्यांचे निवाडियास अंणा निगडीकर व चाफळकर व वडगांवकर येणें प्रमाणें त्रिवर्ग संस्थानी नेमून दिलियावर आपसांत समजावें असा नेम ठरोन, बळवंतराव आबाजी भागवत वीरमाडकर निसबत संस्थान धावडशी हे कोल्हापुरीं होते त्यांसि आणीन, भागवत मंडळींनीं मान्यतेची यादी करून दिलियावर भागवत आणि तांबे यांचे बळावळ कागदीं पत्रीं पाहून तांबे यांणीं पूर्ववत् काम पहावें असें जाहलें. राघो गणेश व पांडुरंग जनार्दन हे काम पहात होते ते आपणास कारभार नको ह्मणोन ७३० रुपये रामचंद्र परशराम भागवत यांज पासून घेऊन काम त्यांचे हवालीं केलें होतें त्याप्रमाणें रामचंद्र परशुराम कारभार करूं लागले. शिक्का मोर्तब ७३० रुपये घेतेवेळीं रामचंद्र परशराम यांजला दिल्हे. ते येणें प्रमाणें त्याजवळ होते. शके १७६९ आश्विन शुद्ध १० मोर्तब शिक्याची पूजा आह्मी करूं ह्मणोन विष्णु गोपाळ यांणीं आग्रह केलियावर रामचंद्र परशुराम यांणीं पूजे निमित्य शिक्का मोर्तब आणून दिले. पूजा करून वहिवाटी प्रमाणें हवालीं करावे ते न करितां आपणांजवळ ठेविले. ते मागावयास आले त्यांसि महाराजां जवळ ठेऊं असें बोलूं लागले. येविशींची याद रामचंद्र परशुराम याणीं दिली, सबब विष्णु गोपाळ यांसि बोलावणें जाहलें. त्याप्रमाणें विष्णु गोपाळ महाराजांचे दर्शनास गेले. आणि शिक्का मोर्तब पुढें ठेऊं लागले. तें पाहून सध्यां तुह्मांपाशीं असूं देणें, स्वारी पेठ पाहून परत आलियावर हुकूम होईल त्याप्रमाणें असावें. नंतर विष्णुपंत निघोन घरीं धावडशीस येऊन कोठीचे कुलपावर आपली चिट्टी डकविली. व गांवगन्ना वसूल घेतला. त्यावर श्रीचा नैवद्य बंद जाहला अशी याद रामचंद्र परशुराम याणीं दिल्यावर कोठीचें दार मोकळें करावें व शिक्का मोर्तब घेऊन रामचंद्र परशुराम भागवत यांचे हवालीं करोन पावती येऊन पाठवणें याप्रमाणें सातार पत्र्यास हुकूम जाहला. त्या प्रमाणें शेकदार येऊन कोठीचे [दरवाजे] मोकळे केले. विष्णु गोपाळ ते वेळेस सा [तारें] मुक्कामीं होते त्यांस ही खबर कळालियावर आपण धावडशीस गेलों असतां आपणा पासून शिक्का मोर्तब बजोर घेतील असा भाव मनांत आणोन परभारें शिक्का मोर्तब घेऊन पुणियास गेले आहेत. विष्णु गोपाळ पर इलाख्यांत गेले आहेत हें वर्तमान महाराजांचे

कानावर जातांच **विष्णु गोपाळ** येऊन हजर होई तावत त्याचे उत्पन्नाची जप्ती करावी. ह्मणून शेरा **धा**वडशीस येऊन ला [ गल्यानंतर ] शके १७७० **चैत्र** शुद्ध द्वितीया बुधवार रोजीं दोन प्रहरीं **छ**त्रपति **म**हाराज यांस उदराचा उपद्रव होऊन **कै**लासवासी जाहले.

---

[ मागील भागांतील पाठांत क्वचित् फेर आहे तो खालीं नमूद करितों:— ]

| पृ० | ओ० | सातारा प्रत. | कोल्हापूर प्रत. |
|---|---|---|---|
| १ | ३ | आदिपवित्र. | आदिपत्र. |
| १ | ८ | योगनिष्ठ | योगभ्रष्ट. |
| १ | १२ | राजुरी. | राजुरें. |
| २ | ५ | ब्रह्मवृत्ति. | ब्रह्मचर्य वृत्ति. |
| ३ | २८ व पुढें | आवाजी बल्लाळ. | आवजी बल्लाळ. |
| ५ | ८ | ' आज्ञा घेऊन. ' | या शब्दापुढें " सामील चिमणा दामोदर वगैरे फौज घेऊन. " असे शब्द. |
| ८ | २१-२२ | बापुजीपंत तांबे. | बापजी राम तांबे. |
| ९ | १६ | दुसरा नारळ. | दुसरे नारळ. |
| ९ | ३१-३२ | ' स्वामी विनाश्रय " इ०. ' | "स्वामीविना त्रैलोक्यांत आधार नाहीं. " |
| १० | १३-१४ | ' धोंडो भास्कर ' इ०. ' कल्याण प्रांतें होता. ' | " धोंडोभास्कर तांबे गोदाजी क[ला]ठे हशमी सरदार होता. " |
| १० | २३ | तालुके. | तर्फ. |
| ११ | ११ | मौजे मजकुरीं बाग. | मौजे मजकुरी शेरी व बाग. |
| ११ | ११ | कागदपत्र न्यावे. | कागदपत्र जपावे. |
| १२ | १ | ऐन गल्ला. | अर्धल गल्ला. |
| १२ | ९ | ते दिवशीं निर्वैर. | ते बिनीवर नदर देऊन. |
| १३ | १४ | तीन गांव × × × | तीन गांव उपनाम |
| १३ | १९ | प्रांत तर्फ कढेपठार. | तर्फ कऱ्हेपठार प्रांत पुणें. |
| १३ | २१ | टिळक. | टिबे. |
| १४ | २६ | क[ला]चें. | कजियाचें. |
| १५ | २ | वस्तवाल इ०. | अस्तमानीं सर्व. |
| १५ | ९ | परस्पराचा. | परस्पर. |
| १६ | २५ | तुझा बळजा. | मुलाहिजा. |
| १६ | २५ | तंगकरी देऊन. | तगरीहून. |

समाप्त.